




दैनिक **चालु वार्ता**

✲ पुणे ✲ वर्ष : ४ ✲ मुख्य संपादक : डि.एस.लोखंडे पाटील ✲ अंक : ३०० ✲ मंगळवार दि.२७ मे २०२५ ✲ पाने : ०४ ✲ किंमत रु.३ ✲ RNI No.: MAHMAR/2021/82895

✲ Chief Editor : D.S.Lokhande Patil ✲ Pune ✲ Vol 4 ✲ Issue 300 ✲ Tuesday ✲ 27 May 2025 ✲ Pages 04 ✲ Price Rs.3 ✲ RNI No.: MAHMAR/2021/82895 ✲ E-mail : dainikchaluwartha@gmail.com

✲ पुणे ✲ नांदेड ✲ छ.संभाजीनगर ✲ बीड ✲ परभणी ✲ हिंगोळी ✲ जालना ✲ लातूर ✲ धाराशिव ✲ मुंबई ✲ पालघर ✲ ठाणे ✲ रायगड ✲ रत्नागिरी ✲ अहमदनगर ✲ सोलापूर ✲ सातारा ✲ अमरावती ✲ यवतमाळ ✲ वर्धा ✲ वाशिम ✲ चंद्रपूर ✲







# सुखाने भाकर खा; नाहीतर माझी गोळी आहेच...

## पंतप्रधान मोदींचा पाकिस्तानला थेट इशारा !

**दै.चालु वार्ता वृत्तसेवा**

**मुंबई :** पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी भूज येथील जाहीर सभेत बोलत असताना पाकिस्तानमधील नागरिकांना इशारा दिला. शस्त्रविराम झाल्यापासून पंतप्रधान मोदी पाकिस्तानला इशारे देत आहेत.

भूज येथील भाषणात बोलत असताना पंतप्रधान मोदी पाकिस्तानला उद्देशून म्हणाले, 'तुम्ही सुखाचे आयुष्य जगा, भाकर खा नाहीतर माझी गोळी आहेच.' भूज येथील जाहीर सभेला संबोधित करत असताना पंतप्रधान मोदी म्हणाले, 'पाकिस्तानातून दहशतवाद संपविण्यासाठी तेथील नागरिकांना पुढे यावे लागेल. तरूणांना पुढाकार घ्यावा लागेल. तुम्ही सुखाने जगा, भाकर खा नाहीतर माझी गोळी आहेच.' यावेळी पंतप्रधान मोदींनी ५३,४०० कोटींच्या विकास प्रकल्पांचे भूमिपूजन आणि उद्घाटन केले.

पहलगाम येथे २२ एप्रिल रोजी झालेल्या दहशतवादी हल्ल्यानंतर ७ मे रोजी भारताने ऑपरेशन सिंदूर राबविले. १० मे पर्यंत भारत-पाक सीमेवर लष्करी तणाव सुरूहोता. त्यानंतर शस्त्रविरामाची घोषणा करण्यात आली. शस्त्रविराम झाल्यानंतर पंतप्रधान नरेंद्र मोदींनी पाकिस्तान मधील दहशतवादाच्या विरोधात आक्रमक पवित्रा घेतल्याचे दिसत आहे.

भूज येथे बोलताना पंतप्रधान मोदी म्हणाले की, आमची मोहीम फक्त सूड



घेण्यापूरती मर्यादीत नव्हती. तर माणुसकीला वाचविणे आणि दहशतवाद संपविण्याचा आमचा प्रयत्न होता. पहलगामच्या हल्ल्यानंतर आम्ही १५ दिवस वाट पाहिली. आम्हाला वाटले पाकिस्तान दहशतवादाच्या विरोधात भूमिका घेईल. पण दहशतवादच त्यांचा अविभाज्य भाग असल्याचे दिसून आले.

भारतीय लष्कराने दिलेल्या प्रत्युत्तराचेही पंतप्रधान मोदींनी कौतुक केले. ते म्हणाले, आपल्या सैन्यानी इतके जबरदस्त प्रत्युत्तर दिले की, पाकिस्तानचे हवाई तळ हे अतिदक्षता विभागात आहे. आपल्या सैन्याच्या शौर्य आणि धाडसामुळेच पाकिस्तानने पांढरे निशाण फडकवले.

भारताने ७ मे रोजी हवाई हल्ला केल्यानंतर पाकिस्तानने ज्याप्रकारे प्रत्युत्तर दिले, त्यावरही पंतप्रधान मोदींनी टीका केली. ते म्हणाले, पाकिस्तानने कच्छसह भारतीय सीमेवर ड्रोन हल्ले केले. पण आमच्या शूरवीर भगिनींनी हे हल्ले परतवून लावले. याआधीही १९७१ च्या युद्धात कच्छमधील महिलांनी भूज उड्डाण तळ अवघ्या ७२ तासांत बांधला होता. त्या महिलांनी मला नुकताच आशीर्वाद दिला असून सिंदूर रोप भेट दिले आहे. हे रोप मी आता पंतप्रधान निवासात लावणार आहे.

पाकिस्तानच्या विचारसरणीवर टीका करताना पंतप्रधान म्हणाले की, भारत देशांना जोडणाऱ्या पर्यटनावर विश्वास ठेवतो. पण पाकिस्तान दहशतवादालाच पर्यटन समजतो. हे जगासाठी धोकादायक आहे.

याशिवाय भारत यापुढे दहशतवाद सहन करणार नाही, असेही त्यांनी सांगितले. 'जो कुणी भारतीला रक्तबंबाळ करण्याचा प्रयत्न करेल, त्यालाही त्याच प्रकारची किंमत मोजावी लागेल. कुणालाही सोडले जाणार नाही', असेही पंतप्रधान मोदींनी ठणकावले.


## ...तर पाकिस्तानवर त्यापेक्षा मोठा हल्ला करू

### अमेरिकेच्या दाव्यावर परराष्ट्रमंत्री जयशंकर थेट बोलले !

**दै.चालु वार्ता वृत्तसेवा**

**मुंबई :** पहलगाम दहशतवादी हल्ल्यानंतर भारताने 'ऑपरेशन सिंदूर' राबवले. त्यानंतर भारत आणि पाकिस्तानमधील तणाव आणखी वाढला. या दरम्यान, १० मे रोजी दोन्ही देशांनी युद्धविराम घोषित केला.

पण, याबाबत अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी केलेल्या विधानावरुन राजकारण तापले आहे. विरोधी पक्ष अजूनही केंद्र सरकारवर अमेरिकेच्या दबावाखाली युद्धविराम जाहीर केल्याचा



आरोप करत आहे. सरकारने वारंवार विरोधकांच्या आरोपांचे खंडन केले आहे. आता पुन्हा एकदा परराष्ट्र मंत्री एस. जयशंकर यांनी या दाव्यांचे खंडन केले अन पाकिस्तानला कडक शब्दात इशाराही दिला.

परराष्ट्र व्यवहार सल्लागार समितीच्या बैठकीत एस. जयशंकर यांनी सहभाग घेतला. सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, यावेळी त्यांनी परकीय हस्तक्षेपावर भाष्य केले. ते म्हणाले की, जेव्हा जेव्हा कोणत्याही देशाने आम्हाला भारत-पाकिस्तान संघर्षाबाबत विचारले, तेव्हा आम्ही त्यांना फक्त एवढेच सांगितले की, समोरुन गोळीबार झाला, तर आम्हीदेखील जोरदार प्रत्युत्तर देऊ. याशिवाय, सिंधू पाणी कराराबद्दल म्हणाले की, जे काही होईल, ते देशाच्या हिताचे असेल आणि चांगलेच असेल.

**अमेरिकेच्या हस्तक्षेपाबद्दल काय म्हणाले ?**

जयशंकर पुढे म्हणाले, ऑपरेशन सिंदूरच्या पहिल्या टप्प्यानंतर जेव्हा अमेरिकन सचिवांनी सांगितले की, पाकिस्तान मोठा हल्ला करूशकतो, तेव्हा आम्ही उत्तर दिले की, जर पाकिस्तान मोठा हल्ला करेल, तर आम्ही त्यापेक्षा मोठा हल्ला करण्यास तयार आहोत. डोनाल्ड ट्रम्प यांच्या मध्यस्थीसंदर्भातील पोस्टवर परराष्ट्रमंत्री म्हणाले, दोन्ही डीजीएमओंमधील चर्चेमुळे युद्धविराम

(पान २ वर...☞)

## पंतप्रधानांचे भाषण कुणालाही विनोदी स्वरूपाचेच वाटेल

### - ठाकरेंचा टोला

**दै.चालु वार्ता वृत्तसेवा**

**मुंबई :** नीती आयोगाच्या दहाव्या गव्हर्निंग कौन्सिलची बैठक पंतप्रधानांच्या अध्यक्षतेखाली राजधानी दिल्लीत पार पडली. या बैठकीला अनेक राज्यांचे मुख्यमंत्री, केंद्रशासित प्रदेशांचे नायब राज्यपाल आणि केंद्रीय मंत्री उपस्थित होते.

बैठकीचे अध्यक्ष या नात्याने जोरकस भाषण करताना पंतप्रधान मोदी यांनी ''केंद्र आणि राज्यांनी 'टीम इंडिया'प्रमाणे एकदिलाने तसेच एकजुटीने काम करण्याचा'' मूलमंत्र राज्यांच्या मुख्यमंत्र्यांना दिला. केंद्रीय सरकारचा गेल्या दहा वर्षांतील विविध राज्यांसोबतचा व्यवहार पाहता पंतप्रधानांचे हे भाषण कुणालाही विनोदी स्वरूपाचेच वाटेल आणि ते साहजिक आहे, असा टोला शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे प्रमुख उद्धव



ठाकरे यांनी लगावला आहे.

'बोले तैसा चाले, त्याची वंदावी पाऊले' असे आपल्याकडे संतांनी सांगून ठेवले आहे. तथापि एखादी व्यक्ती बोलते त्याप्रमाणे वागत नसेल किंवा बोलते त्याच्या नेमके विरुद्ध वागत असेल तर त्या व्यक्तीचे काय करायचे? याचा खुलासा मात्र संतांनी केलेला नाही. उक्ती आणि कृती यामध्ये जमीन-अस्मानचे अंतर ठेवणाऱ्यांचे काय करावे, याचा फैसला संतांनी जनतेवरच सोडला

(पान २ वर...☞)

## आज बाळासाहेब ठाकरे असते तर...

### अमित शाह यांचं नांदेडमध्ये मोठं वक्तव्य

**दै.चालु वार्ता वृत्तसेवा**

**मुंबई :** केंद्रीय गृहमंत्री अमित शाह हे आज नांदेडच्या दौऱ्यावर आहेत, निवडणुकीनंतर त्यांचा हा पहिलाच दौरा आहे, यावेळी बोलताना त्यांनी पुन्हा एकदा शिवसेना ठाकरे गट आणि काँग्रेसवर जोरदार हल्लाबोल केला आहे. ऑपरेश सिंदूरनंतर मोदींनी निर्णय घेतला, सर्व पक्षीय खासदारांनी वेगवेगळ्या देशात जाऊन पाकिस्तानचा खरा चेहर उघड करावा, तेव्हा शिवसेना ठाकरे गटाच्या प्रमुखांनी म्हटलं, कोणाची वरात निघाली आहे, आज बाळासाहेब ठाकरे असते तर, ऑपरेशन सिंदूरनंतर नरेंद्र मोदी यांची गळा भेट घेत घेतली असती, असं अमित शाह यांनी म्हटलं आहे.

**नेमकं काय म्हणाले अमित शाह?**

अमित शाह हे आज नांदेडच्या दौऱ्यावर आहेत, निवडणुकीनंतर अमित शाह यांचा हा पहिलाच नांदेड दौरा आहे. यावेळी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष बी आर कदम यांनी भाजपात प्रवेश केला. यावेळी बोलताना अमित शाह यांनी काँग्रेस आणि शिवसेना ठाकरे गटावर जोरदार हल्लाबोल केला आहे.



'नांदेड गुरूगोविंद सिंह यांची भूमी आहे, इथून पाकिस्तानला आवाज गेला पाहिजे, मोठ्या आवाजात म्हणा भारत माता की जय, २२ तारखेला पाकिस्तान पुरस्कृत दहशतवाद्यांनी धर्म विचारून निदोष भारतीयांना त्यांच्या कुटुंबासमोर मारलं. त्यानंतर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी पाटनामध्ये दहशतवाद्यांना शोधून त्यांना मातीत मिळवू असं म्हटलं होतं, १५ वर्षांपूर्वी काँग्रेसचं सरकार होतं, आता मोदी यांचं सरकार आहे.

त्यांनी पुलवामावर हल्ला केला, आपण एअर स्ट्राईक केला. त्यांनी पहलगामवर हल्ला केला आपण ऑपरेशन सिंदूर केलं. पूर्ण जगाला संदेश दिला आहे, भारताला डिवचू नका, नाहीतर परिणाम वाईट होतील, सात मे रोजी अवघ्या बावीस मिनिटांमध्ये दहशतवाद्यांचे ९ ठिकाण उद्धवस्त केले. त्यांच्या हेडकॉटरला उडवण्याचे काम भारतीय सैन्याने केलं. आठ तारखेला पाकिस्तानने ड्रोन हल्ला केला, पण आपण त्यांचा हल्ला परतून लावला, नऊ मे रोजी आपण पाकिस्तानवर हल्ला केला, या हल्लयामध्ये त्यांचे एअर बेस उद्धवस्त केले, मोदींनी या ऑपरेशनला सिंदूर असं नाव दिलं, आमच्या मुलीच्या कपाळावरील कुंकू स्वस्त नाही हे त्यांनी दाखवून दिलं, असं यावेळी अमित शाह यांनी म्हटलं आहे.

दरम्यान यावेळी बोलताना त्यांनी उद्धव ठाकरे यांच्यावर देखील जोरदार हल्लाबोल केला आहे. ऑपरेशन सिंदूर नंतर मोदींनी निर्णय घेतला, सर्व पक्षाचे खासदार वेगवेगळ्या देशात जाऊन पाकिस्तानचा खरा चेहरा उघड करतील, शिवसेना ठाकरे गटाच्या प्रमुखांनी म्हटलं कोणाची वरात निघाली आहे, आज बाळासाहेब ठाकरे असते तर ऑपरेशन सिंदूर नंतर नरेंद्र मोदी यांची गळा भेट घेत घेतली असती. नरेंद्र मोदी यांनी ठरवलं आहे, २०४७ पर्यत भारत विकसीत होईल, देवेंद्र फडणवीस पुन्हा मुख्यमंत्री झाले आहेत, या पाच वर्षांत मराठवाड्यातील प्रत्येक गावात पाणी पोहोचेल, असं शाह यांनी यावेळी म्हटलं आहे.

## वक्फ कायद्याच्या विरोधात हिंदू बांधवांनी साथ द्यावी

### मुस्लिम पर्सनल लॉ बोर्डचे आवाहन!

**दै.चालु वार्ता वृत्तसेवा**

**मुंबई :** केंद्र सरकारने चुकीच्या पद्धतीने वक्फ कायद्यात सुधारणा करून नवीन कायदा तयार केला. त्यामुळे आम्ही देशभरात मुस्लिम पर्सनल लॉ बोर्डाच्या माध्यमातून विरोध करतोय. या विरोधात हिंदू बांधवांनीही साथ द्यायला हवी. ही लढाई कोणत्या जातीधर्माच्या विरोधात नाही.

सरकारच्या चुकीच्या धोरणांविरुद्ध आहे. या देशाचे आम्ही नागरिक आहोत. या देशाचे वारसदार आहोत, आमच्या पूर्वजांचा वारसा आम्हीच सांभाळणार, असे मत मौलाना यासीन अली उस्मानी बदायूनी यांनी व्यक्त केले.

आमखास मैदानावर रविवारी रात्री 'तहफ्फुज-ए-औकाफ कॉन्फरन्स'चे आयोजन केले होते. सायंकाळपासून पावसाची रिपरिप सुरूअसतानाही हजारोंच्या संख्येने अल्पसंख्याक बांधव परिषदेला उपस्थित होते. 'मगरिब'च्या



नमाजनंतर सुरूझालेल्या परिषदेत अनेक मान्यवरांनी वक्फ कायद्याच्या नव्या मसुद्याच्या विरोधात मत व्यक्त केले. यावेळी एमआयएम पक्षाचे नासेर सिद्दीकी, राष्ट्रवादीचे इलियास किरमाणी, रफियोद्दीन अशरफी, जुनैद-उर-रेहमान कासमी, मौलाना इलियास फलाही, दिल्लीचे ॲड. शमशाद, मौलाना मोईजोद्दीन कासमी, जियाउद्दीन सिद्दीकी, महेफूज-उर रहेमान यांनी मार्गदर्शन केले.

**पूर्वजांच्या जमिनी वाचवणार**


ऑल इंडिया मुस्लीम पर्सनल लॉ बोर्डाचे सदस्य हजरत मौलाना उमरैन महफूज रहमानी यांनी सरकारला इशारा दिला की वातावरण खराब नका करू, आमच्या पूर्वजांच्या जमिनी आम्हीच वाचवणार आहोत. आमच्यासोबत व्यासपीठावर हिंदू भाऊही उभे आहेत.

-उमरैन महफूज रहमानी

**जमिनींचा वापर इस्लामसाठीच**

मुस्लिमांच्या पूर्वजांनी

(पान ३ वर...☞)



### तापमान

| | | | |
|---|---|---|---|
| दिवस : 29° | उच्च | 24k सोने प्रति १० ग्रॅम | रू. ९७,६४०/- |
| रात्र : 23° | किमान | 22k सोने प्रति १० ग्रॅम | रू. ८९,५००/- |
| सूर्योदय : १३ तास ०७ मिनिटे | | चांदी प्रति किलो | रू. १,००,०००/- |
| उगवणे : 05:58 AM | | डॉलर प्रति दर | रू.८५.०९ |
| मावळणे : 07:05 PM | | पेट्रोल | रू. १०३.५०/- |
| सूर्यास्त : १३ तास ३६ मिनिटे | | डिझेल | रू.९०.०३/- |
| उगवणे : 04:02 PM | | | |
| मावळणे : 06:26 AM | | | |

## मोदी सरकासाठी काम करताय का ?


### शशी थरूर यांचं सडेतोड उत्तर; 'त्या' चर्चांना पूर्णविराम...

**दै.चालु वार्ता वृत्तसेवा**

**मुंबई :** पाकिस्तानचा दहशतवादी पोसणारा चेहरा जगासमोर आणण्यासाठी भारतातील सर्वपक्षीय खासदार व माजी सनदी अधिकाऱ्यांची सात शिष्टमंडळं जगभरातील वेगवेगळ्या देशांच्या दौऱ्यावर पाठवण्यात आली आहेत.

ही शिष्टमंडळे वेगवेगळ्या देशांत जाऊन भारताची बाजू मांडत आहेत, दहशतवाद्यांविरोधात भारतीय लष्कराने राबवलेल्या 'ऑपरेशन सिंदूर'ची माहिती व गरज पटवून देत आहेत. काँग्रेस खासदार शशी थरूर यांच्या नेतृत्वाखालील सर्वपक्षीय खासदारांचं शिष्टमंडळ अमेरिकेच्या दौऱ्यावर पाठवण्यात आलं आहे.

भारताची शिष्टमंडळं आंतरराष्ट्रीय पातळीवर पाकिस्तानच्या कुरापती जाहीर करत आहेत. यामध्ये काँग्रेस खासदार शशी थरूर आघाडीवर आहेत. या शिष्टमंडळाचं नेतृत्व करण्यासाठी निवड झाल्यापासूनच



थरूर देशभर चर्चेत आहेत. शशी थरूर यांची या शिष्टमंडळाबरोबर परदेशात जाण्यासाठी काँग्रेसने नव्हे तर केंद्र सरकारने निवड केली होती. त्याचबरोबर अलीकडच्या काळात थरूर व काँग्रेसमध्ये तणाव असल्याची चर्चा रंगत होती. त्यावरून थरूर यांना प्रश्न विचारण्यात आला की तुम्ही मोदी सरकारसाठी काम करत आहात का? यावर थरूर म्हणाले, 'मी सरकारसाठी काम करत नाही, मी विरोधी पक्षातला नेता आहे. मी इथे माझ्या देशाची बाजू मांडायला आलो आहे.

**'मी सरकारसाठी काम करत नाही'**

शशी थरूर म्हणाले, 'मी सरकारसाठी काम करत नाही. तुम्हा सर्वांना कल्पना आहे की मी विरोधी पक्षात आहे. परंतु, अलीकडेच मी देशातील लोकप्रिय वृत्तपत्र दी इंडियन एक्सप्रेसमध्ये माझे विचार मांडले होते. त्या लेखाद्वारे मी माझे विचार ठामपणे मांडले होते. मी लिहिलं होतं की यावेळी पाकिस्तानला केवळ जशास तसं प्रत्युत्तर देऊन चालणार नाही, उलट एक पाऊल पुढं जावं लागेल. भारतीय लष्कराने नेमकं तेच केलं हे पाहून मला खूप समाधान झालं आहे. भारताने यावेळी ज्या पद्धतीने पाकिस्तानच्या मुसक्या आवळल्या, तिथे स्ट्राइक केला तो त्यांच्यासाठी स्पष्ट संदेश आहे की आम्ही त्यांच्या कुरापती सहन करणार नाही. दहशतवाद आम्हाला झुकवू शकणार नाहीत'.

अलीकडच्या काही महिन्यांमध्ये काँग्रेस केंद्र सरकारविरोधात विविध मुद्द्यांवर आक्रमक झालेली असताना थरूर यांनी मात्र मवाळ भूमिका घेतली होती. त्यामुळे थरूर आणि काँग्रेसचं काही मुद्द्यांवर एकमत

(पान ४ वर...☞)



# देहू संस्थानला १ कोटींचा निधी मंजूर

दै.चालु वार्ता वृत्तसेवा
पिंपरी चिंचवड - प्रतिनिधी
बद्रीनारायण घुगे





**देहूगांव :** देहूगांव वारकरी संप्रदायाच्या आध्यात्मिक परंपरेचा गौरव करणारा संत तुकाराम महाराजांचा ३७५ वा वैकुंठगमन महोत्सव ओतूर येथे अत्यंत भक्तिभावाने साजरा होत आहे. या निमित्ताने ओतूर गावात जगद्गुरु तुकाराम महाराज, त्यांचे सद्गुरू आणि आज पुण्यतिथी असलेले संत चोखोबा महाराज यांचा त्रिवेणी संगम साधल्याची भावना भाविकांत दाटून आली.

या महोत्सवाच्या निमित्ताने उपस्थित भाविकांच्या माध्यमातून श्रीअक्षयमहाराज भोसले यांनी प्रकाशनासाठी देहू संस्थानच्या वतीने एक रुपये कोटींची मागणी केली असता महाराष्ट्र शासनाच्या मराठी भाषा विभागामार्फत देहू संस्थानसाठी संत तुकाराम महाराज अभंग गाथेच्या प्रकाशनासाठी एक कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला असून, हा निधी ४८ तासांत अधिकृत खात्यावर वर्ग केला जाणार आहे. संत श्रीतुकाराम महाराजांच्या गाथेचे ईबुक करुन विश्वभर संत साहित्य नेणार. अशी घोषणा मराठी भाषा मंत्री उदय सामंत यांनी केली.

या प्रसंगी उपस्थित भाविकांना उद्देशून बोलताना ना. सामंत म्हणाले, 'ज्यांच्या 'तुकाराम तुकाराम' नामाचा उच्चार जरी केला तरी यमालाही थरकाप सुटतो, त्या संतांच्या गाथेचे रक्षण साक्षात भगवंताने केले. ही गाथा म्हणजे पाचवा वेद आहे. यापूर्वी ज्ञानेश्वरी छपाईसाठी देखील आपण एक कोटींचा निधी उपलब्ध करुन दिला.'

या उत्सवात माऊली महाराज कदम (छोटे माऊली) यांच्या नेतृत्वात महाराष्ट्रातील विविध भागांतून लक्षावधी वारकरी सहभागी झाले आहेत. ही अभूतपूर्व उपस्थिती वैश्विक विक्रमात नोंदवली जाईल असा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला. यावेळी संत नामदेव महाराज यांचे वंशज केशवमहाराज नामदास, संत तुकाराम महाराज यांचे वंशज व देहू देवस्थान विश्वस्त जालीदर महाराज मोरे दिलिप महाराज मोरे माणिकमहाराज मोरे, पुरुषोत्तममहाराज मोरे, देहू संस्थान विश्वस्त उमेशमहाराज मोरे, आमदार शरद सोनावणे, शिवसेना सचिव राम रेपाळे, शिवसेना धर्मवीर अध्यात्मिक सेना प्रदेशाध्यक्ष अक्षयमहाराज भोसले व मान्यवर उपस्थित होते.

तत्कालीन मुख्यमंत्री, विद्यमान उप मुख्यमंत्री एकनाथ शिंदेच्या नेतृत्वात शासनाच्या वतीने ऐतिहासिक निर्णय घेण्यात आले होते :

१) वारकऱ्यांच्या दिंड्यांना प्रथमच रू.२०,००० अनुदान

२) विमा संरक्षण योजना राबवली गेली

३) अभिजात मराठी भाषेचा दर्जा मिळविण्यासाठी संत साहित्याचा आधार

वारकरी संप्रदायाच्या सेवेसाठी उप मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखाली सर्वतोपरी प्रयत्न होत असून, यामध्ये शासन आणि वारकरी समाजाचा अभिन्न संवाद सुरूआहे.

# मोटार सायकल चोरी करणाऱ्या आरोपीला बीड येथुन घेतले ताब्यात

दै.चालु वार्ता वृत्तसेवा
जालना - प्रतिनिधी
आकाश माने



## स्थानिक गुन्हे शाखेची कारवाई

**जालना :** जालना जिल्हयात मोटार सायकल चोरी करणाऱ्या ईसमाची माहिती घेऊन कारवाई करणे बाबत पोलीस अधीक्षक साहेब यांनी स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक पंकज जाधव व पथकास सुचना दिल्या होत्या. त्यानुषंगाने दिनांक ०२/०४/२०२५ रोजी १४.३० वा. डावरगाव ते झिरपी फाटयादरम्यान अनोळखी इसमाने फिर्यादी नामे विश्वनाथ एकनाथ मिरकड, वय-३३ वर्ष, व्यवसाय-शेती, रा. कोळवाडी, ता.जि. जालना यांची होंडा शाईन मोटार सायकल चोरी केली असल्याने सदर गुन्हयातील अनोळखी आरोपीताचा शोध घेत असतांना तांत्रिक विश्लेषणाच्या आधारे आरोपी नामे विकास ऊर्फ मिड्डु संजय बहिरे, वय-२९ वर्ष, रा. कन्हेरवाडी, ता. परळी, जि.बीड याने सदरचा गुन्हा केला असल्याचे निष्पन्न झाल्याने आरोपी नामे विकास ऊर्फ मिड्डु संजय बहिरे, वय-२९ वर्ष, रा. कन्हेरवाडी, ता. परळी, जि.बीड यास बीड येथुन ताब्यात घेवुन त्याकडे गुन्हयाच्या अनुषंगाने चौकशी केली असता त्याने गुन्हा केल्याची कबुली देवुन गुन्हयातील चोरी केलेली होंडा शाईन कंपनीची एक मोटार सायकल काढुन दिल्याने ती जप्त करण्यात आली आहे.

सदरची कार्यवाही पोलीस अधीक्षक अजयकुमार बंसल व मा. अपर पोलीस अधीक्षक आयुष नोपाणी, उपविभागीय पोलीस अधिकारी, अंबड विशाल खांबे यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक पंकज जाधव, सपोनि. योगेश उबाळे, पोउपनि राजेंद्र वाघ, पोलीस अंमलदार सुधीर वाघमारे, दिपक घुगे, लक्ष्मीकांत आडेप, सागर बाविस्कर, देविदास भोजने, ईरशाद पटेल, सतिष श्रीवास, आक्रुर धांडगे, भागवत खरात, धीरज भोसले, कैलास चेके, सौरभ मुळे सर्व स्था.गु.शा. जालना यांनी केली आहे.

# नुकसान ग्रस्त शेतकऱ्यांचे सरसकट पंचनामे करून प्रशासनाने नुकसान भरपाई द्यावी - प्रविण माने

दै.चालु वार्ता वृत्तसेवा
इंदापूर - प्रतिनिधी
बापू बोराटे



**इंदापूर तालुक्यातील बहुतांश गावांवर ओढवलेली परिस्थिती हि अतिशय भयंकर असून, नदी किनाऱ्यावरील स्थलांतरीत नागरिकांसह, शेतकरी बांधवांना नुकसान भरपाई मिळवून देवून त्यांचे अश्रू प्रशासनाने तातडीने पुसावेत हीच माझी प्रमुख मागणी असून, यासाठी मी जातीने पाठपुरावा करणार आहे.**

**पुणे (इंदापूर) :** रविवार दिनांक २५ मे रोजी इंदापूर तालुक्यात झालेल्या ढगफुटीसदृश पावसाने सर्वत्र प्रचंड नुकसान झाल्याची परिस्थिती आहे. मे महिन्याच्या अखेरीस आपल्या परिसरात एवढ्या मोठ्या प्रमाणावर पाऊस कधी होत नसल्याने, अवकाळी ओढवलेल्या या परिस्थितीने शेतकरी बांधवांचे व नागरिकांचे अतोनात नुकसान झाले आहे. ढगफुटीसदृश पावसाने, नीरा नदीच्या पाणी पातळीतदेखील अचानक वाढ होऊन, नदीच्या काठावरील गावांतून पूर सदृश परिस्थिती निर्माण झाली होती. यामुळे एकीकडे ढगफुटीसारखा पाऊस व त्यावर नीरा नदीच्या पुराने नागरिकांची चांगलीच दैना झाल्याची परिस्थिती पहावयास मिळत आहे.

इंदापूर तालुक्यातील शेटफळगढे, भिगवण, मदनवाडी, भिगवण स्टेशन, सणसर, जांब, कुरवली, चिखली, उद्धट, लाकडी, निंबोडी आदी गावांसह नीरा नदी काठची गावे हि विशेष बाधित झाल्याची परिस्थिती आहे. या परिसरातील नागरिकांच्या घरात पाणी शिरल्याने येथील कुटुंबांचे मोठे नुकसान झाले आहे.


नागरीवस्तीप्रमाणे दुसरा सर्वांत जास्त बाधित घटक म्हणजे शेती असून, कालच्या ढगफुटीसदृश अवकाळी पावसाने डाळिंब, द्राक्षे, पेरू, केळी या फळबागांचे तसेच मका, कांदा, भुईमुग, चारा पिकांसह शेतातील इतर सर्व पिकांचे आतोनात नुकसान झाले आहे. काही ठिकाणी पाण्याचा लोंढा प्रचंड असल्याने शेतीतील माती वाहून गेली असून, काही प्रमाणात पशुधनाचेही नुकसान झाले असल्याचे निदर्शनास आले.

इंदापूर विभाग हा तसा कमी पावसाचा प्रदेश परंतु कालच्या ढगफुटीसदृश पावसाने छोट्या छोट्या ओढ्यांना अक्षरशः नदीचे स्वरूप प्राप्त झाल्याची परिस्थिती झाली होती. यातून शिकवण घेऊन तालुक्यातील नागरिकांना आगामी पावसाळ्यात सावधतेने राहणे अतिशय गरजेचे होणार आहे. तसेच तालुक्यात अद्याप काही ठिकाणी रस्त्यांची अवस्था अतिशय गंभीर असून येत्या पावसाळ्यात हि परिस्थिती अतिशय हालाकीची होण्याची परिस्थिती आहे, यामुळे पावसाने उघडीप दिल्यावर या रस्त्यांची कामेही गुणावत्तापूर्वक पद्धतीने व्हायला हवी. या पार्श्वभूमीवर पुणे जिल्हा परिषदेचे माजी सभापती प्रविण माने यांनी अवकाळी पाऊसाने बाधित गावांना भेट देत पाहणी केली. शेती पिके, फळबागा, घरे, व मालमत्ता यांचे कृषी, महसूल, ग्रामविकास खात्याने तातडीने पंचनामे पूर्ण करून, कुठल्याही शेतकरी बांधवावर अन्याय होणार नाही या पद्धतीने काम करण्याच्या सूचना संबंधित अधिकाऱ्यांना माने यांनी दिल्या. याचसह कालच्या पावसाने रस्ते व पुल यांचेही अतोनात नुकसान झाले आहे, त्याचीही तातडीने दुरुस्ती करण्याची मागणी यावेळी प्रशासनाकडे करण्यात आली असून, शासनाच्या माध्यमातून नागरिकांना तातडीने मदत मिळण्याकरता आपण स्वतः जातीने लक्ष घालणार असल्याचा शब्द माने यांनी नागरिकांना दिला.

या पाहणी दौऱ्यात कृषि उत्पन्न बाजार समितीचे मा.सभापती मयूरसिंह पाटील, शेटफळगढे गावचे सरपंच शंकर राऊत, अमोल साळुंखे, अमोल झगडे, संदीप मचाले, माऊली भोसले, रोहित कदम, अनिल घोरपडे, अशोक जगताप, शिवाजी मचाले, अविनाश मचाले, दिपक वाबळे, सतीश मचाले, अमोल मचाले, आदित्य हिडगे,अमोल मचाले, किरण खोचरे, पंढरीनाथ कदम,पंडित जोशी,तलाठी गर्जे भाऊसाहेब, ग्रामसेवक अशोक कदम आदी उपस्थित होते.

# ११०० चिकू बागायतदारांच्या खात्यावर विमा भरपाई जमा

दै.चालु वार्ता वृत्तसेवा
डहाणू - प्रतिनिधी
सुधीर घाटाळ



## आमदार विनोद निकोले यांच्या प्रयत्नांना यश

**डहाणू :** डहाणू तालुक्यातील बागायतदारांना अखेर दिलासा मिळाला आहे. खरीप हंगाम २०२४-२५ मधील पिकविमा भरपाईची प्रतीक्षा संपत, सुमारे ११०० चिकू बागायतदारांच्या खात्यावर विमा रक्कम जमा झाली आहे. ही भरपाई आमदार कॉ. विनोद निकोले यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याचा आणि प्रखर भूमिका घेण्याचा परिपाक मानली जात आहे. डहाणू रोड येथील शासकीय विश्रामगृहात नुकतीच एक सखोल आढावा बैठक घेण्यात आली. या बैठकीस आमदार निकोले यांच्या अध्यक्षतेखाली बजाज इन्शुरन्स कंपनीचे प्रतिनिधी गौतम नोगिया आणि सुजय मुकणे, विविध शासकीय अधिकारी, तालुका कृषी अधिकारी अनिल नरगुलवार, जनता बँकेचे अध्यक्ष मिहीर शहा यांच्यासह मोठ्या संख्येने बागायतदार उपस्थित होते. विमा कंपनीच्या प्रतिनिधींनी स्पष्ट केले की, केंद्र शासनाचा निधी प्राप्त झाला असून राज्य शासनाकडील हिस्सा प्रक्रियेत आहे. मात्र, आमदार निकोले यांच्या दबावामुळे कंपनीने तत्काळ भरपाई प्रक्रिया सुरू केली आणि अवघ्या दोन दिवसांत ११०० शेतकऱ्यांच्या खात्यावर विमा रक्कम जमा झाली.

बैठकीत बागायतदारांनी विविध प्रश्न मांडले. चंडिगावचे बळवंत राऊत यांनी सध्याची हेक्टरी ७०,००० रुपयांची भरपाई अपुरी असून ती एक लाख रुपये करण्यात यावी, अशी मागणी केली. पोफरणचे निलेश पाटील, बोर्डीचे निरज प्रदीप पाटील आणि चिकू उत्पादक संघाचे अध्यक्ष विनायक बारी यांनी ॲग्रीस्टॅक, ई-पिक पाहणी, ट्रिगर माहिती आदी अडचणी सविस्तर मांडल्या. या सर्व मुद्द्यांवर आमदार निकोले यांनी शासकीय यंत्रणेला विचारणा करून त्वरित उत्तर मिळवले. याशिवाय, खाजगी व्यापाऱ्यांकडून घेतल्या जाणाऱ्या १०% कमिशनचा मुद्दाही उपस्थित करण्यात आला. आमदारांनी या शोषणविरोधात लवकरच निर्णायक बैठक घेण्याचे आश्वासन दिले.

बैठकीत प्रविण बारी, देवेंद्र राऊत, चंद्रकांत पाटील, रुस्तम ईराणी, जय भानुशाली, विनोद बारी यांच्यासह शेकडो बागायतदार सहभागी होते. ही बैठक बागायतदारांच्या व्यथा मांडणारी आणि त्यावर ठोस तोडगा देणारी ठरली. आमदार निकोले यांनी पुन्हा एकदा आपल्या भूमिकेतून सिद्ध केले की, शेतकऱ्यांच्या न्यायहक्कासाठी प्रभावी लढा देणारा लोकप्रतिनिधी सक्षम परिवर्तन घडवू शकतो. विमा कंपनीवर निर्माण झालेल्या दबावामुळे शेतकऱ्यांना वेळेत आणि योग्य भरपाई मिळून त्यांचे आर्थिक हित साधले गेले, हे याचे ठोस उदाहरण आहे.

# टोरेंट पॉवर लिमिटेड (दिवा विभाग) विरोधात नागरिकांमध्ये तीव्र नाराजी

दै.चालु वार्ता वृत्तसेवा
ठाणे - प्रतिनिधी
नागेश पवार



**दिवा :** टोरेंट पॉवर लिमिटेड (दिवा विभाग) यांच्यामार्फत दिवा शहरातील अनेक भागात वारंवार शट डाऊन घेण्यात येत आहे. दिवसातून अनेक वेळा वीज खंडित होत असल्यामुळे घरगुती कामकाज,पाणीपुरवठा, विद्यार्थी, ऑनलाईन काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांचे तसेच लहान मोठ्या व्यवसायिकांचे व्यवहार ठप्प होत आहेत.

याबाबत नागरिकांनी वारंवार तक्रारी करूनही प्रायव्हेट वीज वितरण कंपनीकडून याबाबत ठोस उपाययोजना झालेली नाही. परिणामी लोकांमध्ये तीव्र असंतोष पसरला आहे. वारंवार वीज पुरवठा खंडित होत असल्याने फ्रिज,पंखे,टी.व्ही, वॉशिंग मशीन यासारख्या महागड्या उपकरणांचे नुकसान होत आहे. तसेच रुग्णालये, शाळा, ऑफिस यांसारख्या महत्त्वाच्या ठिकाणी या समस्येचा परिणाम जाणवतो आहे.

स्थानिक नागरिक सामाजिक संस्था आणि व्यापाऱ्यांकडून संबंधित कंपनीला तातडीने पुढाकार घेऊन दोश दूर करावा तांत्रिक दुरुस्ती करावी आणि वीज पुरवठा सुरळीत ठेवावा अशा आशयाची मागणी करण्यात येत आहे. जर तातडीने या गंभीर समस्येवर लक्ष दिले नाही तर नागरिकांनी तीव्र आंदोलनाचा इशाराही दिला. दिवा शहरातील नागरिकांना भेडसावणारी ही समस्या गंभीर स्वरूपाची असून प्रशासनानेही ह्यात लक्ष घालून वीज वितरण कंपनीला कठोर सूचना द्याव्यात अशी मागणी शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे कल्याण ग्रामीण विधानसभा प्रमुख रोहिदास मुंडे यांनी टोरेंट पॉवर लिमिटेड चे अधिकारी पांचाळ व संघषण खोब्रागडे यांच्याकडे निवेदनाद्वारे केली. निवेदना प्रसंगी दिवा शहर महिला संघटिका सौ.ज्योती पाटील, युवा सेना शहर अधिकारी अभिषेक ठाकूर, उपशहर संघटक प्रवीण ऊतेकर, विभाग प्रमुख राज रसाळ, उपविभाग प्रमुख संदीप राऊत, गजानन शेलार उपस्थित होते.

# अवकाळीने शेतीची कामे ठप्प..

दै.चालु वार्ता वृत्तसेवा
वाघोली - प्रतिनिधी
स्वरुप गिरमकर



१ मे ते ५ जूनपर्यंत शेतीची नांगरणी, वखरणी, कोळपणी, अंतर्गत दुरुस्ती, शेणखत टाकणे, बांधबंदिस्ती करणे आदी कामे करण्याची वेळ असते. तसेच मे मध्ये शेतीची नांगरणी होऊन जमीन तापली तरच जून महिन्यात लागवड झालेल्या पिकांची उगवणक्षमता चांगली असते. मात्र, या मे महिन्यातील अवकाळी पावसाच्या मुक्कामाने खरीपपूर्व मशागतीची कामे खोळंबली आहेत.

**- भानुदास चव्हाण,**
**प्रगतशील शेतकरी, उरळगाव, शिरूर, पुणे.**

**(पुणे) वाघोली :** गेल्या पंधरा दिवसांपासून अवकाळी पावसाने रब्बी पिकांचे नुकसान करीत शेतीच्या नियोजनावर पाणी फेरले आहे. मे महिना शेती मशागतीसाठी अत्यंत महत्त्वाचा असताना, या काळात वादळी वाऱ्यासह झालेल्या पावसामुळे शेतकऱ्यांचे काम ठप्प झाले आहे.नांगरणी, खत टाकणे, बांधबंदिस्ती यांसारखी पूर्वतयारी होण्याआधीच वातावरणाने पलटी घेतल्यामुळे खरीप हंगामाच्या पेरणीवर संकटाचे सावट घोंगावत आहे.

पुणे जिल्ह्यात पंधरा दिवसांपासून वादळी वाऱ्यासह कुठे रिमझिम, तर कुठे मुसळधार अवकाळी पाऊस झाल्याने मशागतीच्या कामांना ब्रेक लागला असून, शेतकऱ्यांचीही चांगलीच तारांबळ उडत आहे. ही परिस्थिती आणखी आठ-दहा दिवस कायम राहिल्यास खरीप हंगामात पेरणी कशी करावी, असा सवाल शेतकऱ्यांकडून उपस्थित केला जात आहे.जूनमध्ये पावसाळा सुरूहोतो. ७ जूनपासून मृग नक्षत्राला प्रारंभ होऊन त्यात पाऊस पडल्यास शेतकरी पहिल्याच पावसात खरीप हंगामाची पेरणी करतात. म्हणून खरीप हंगामासाठी मे महिना महत्त्वाचा असतो.

**अवकाळीचा मुक्काम**

अजून अवकाळी पाऊस ३० मे पर्यंत मुक्कामी असल्याचे सांगितले जात असल्याने जूनच्या पहिल्या आठवड्यात मृग नक्षत्रात पेरणीसाठी शेती तयार होईल का, हा प्रश्न सतावत आहे. आता मोठ्या प्रमाणात पडणाऱ्या अवकाळी पावसाने पावसाळ्यात पाऊस लांबणार तर नाही ना हाही प्रश्न शेतकऱ्यांना सतावू लागला आहे.

(पान १ वरून...)

## पंतप्रधानांचे भाषण कुणालाही विनोदी ....

असल्याने आता जनतेलाच काय तो निर्णय घ्यावा लागणार आहे. हे सगळे एवढ्या विस्ताराने सांगण्याचे कारण म्हणजे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे नीती आयोगाच्या बैठकीतील भाषण, असे उद्धव ठाकरे यांनी सामना दैनिकातील अग्रलेखात म्हटले आहे.

केंद्र सरकार आणि राज्य सरकारांनी 'टीम इंडिया'प्रमाणे एकत्रितपणे काम करावे'', असे मार्गदर्शन पंतप्रधान मोदी यांनी शनिवारी केले. विरोधी पक्षांच्या नऊ मुख्यमंत्र्यांपैकी पश्चिम बंगालच्या ममता बॅनर्जी, केरळचे पी. विजयन आणि कर्नाटकचे सिद्धरामय्या हे तीन मुख्यमंत्री या बैठकीला गैरहजर होते, असे त्यांनी म्हटले आहे.

(पान १ वरून...)

## तर पाकिस्तानवर त्यापेक्षा मोठा हल्ला करू....

झाला, त्यात कोणत्याही देशाची भूमिका नव्हती. हा आमचा द्विपक्षीय मुद्दा, यात तिसऱ्या देशाचा हस्तक्षेप मान्य नाही, असेही त्यांनी पुन्हा एकदा स्पष्ट केले.

**ऑपरेशन सिंदूरची माहिती पाकिस्तानला दिली?**

परराष्ट्रमंत्री एस जयशंकर यांच्या एका व्हिडिओ क्लिपवरुन मोठा वाद झाला आहे. ऑपरेशन सिंदूरची माहिती पाकिस्तानला आधीच दिल्याचा आरोप विरोधक करत आहेत. यावर स्पष्टीकरण देताना जयशंकर म्हणाले की, ऑपरेशन सिंदूरपूर्वी नाही, तर ऑपरेशन पूर्ण झाल्यानंतर पाकिस्तानला माहिती देण्यात आली होती.



# हरित क्रांतीचे जनक कै.वसंतराव नाईक यांच्या पुतळ्याचे केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांच्या हस्ते लोकार्पण



## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची प्रमुख उपस्थिती

दै.चालु वार्ता वृत्तसेवा
नांदेड - प्रतिनिधी
प्रा.विजयकुमार दिग्रसकर

**नांदेड :** हरित क्रांतीचे जनक तथा महाराष्ट्र राज्याचे माजी मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांचा पुर्णाकृती पुतळा व परिसर सुशोभिकरण कामाचा लोकार्पण सोहळा आज केंद्रीय गृह व सहकार मंत्री अमित शाह यांच्या हस्ते संपन्न झाला. या सोहळ्या प्रसंगी प्रमुख अतिथी म्हणून राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे उपस्थित होते.

नांदेड शहरातील कै.वसंतराव नाईक चौक येथे पार पडलेल्या या लोकार्पण सोहळ्याप्रसंगी कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून इतर मागास बहुजन कल्याण, दुग्धविकास, अपारंपारिक ऊर्जा तथा नांदेड जिल्ह्याचे पालकमंत्री अतुल सावे यांच्यासह महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे, पशुसंवर्धन मंत्री पंकजा मुंडे, महिला व बालकल्याण राज्यमंत्री मेघना बोर्डीकर, खासदार अशोक चव्हाण, बाळासाहेब ठाकरे हरिद्रा (हळद) संशोधन व प्रशिक्षण केंद्राचे अध्यक्ष तथा विधान परिषद सदस्य आमदार हेमंत पाटील, आमदार बालाजी कल्याणकर, आमदार बाबुसिंग महाराज राठोड, आमदार बाबुराव कदम, आमदार श्रीजया चव्हाण, जिल्हाधिकारी राहुल कर्डिले, पोलीस अधिक्षक अबिनाश कुमार, जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मेघना कावली, मनपा आयुक्त डॉ. महेशकुमार डोईफोडे आदी उपस्थित होते.

प्रारंभी मंचावर केंद्रीय गृहमंत्री अमित शाह आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे आगमन झाल्यानंतर त्यांनी कै.वसंतराव नाईक यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. यानंतर शाह यांनी कळ दाबुन पुतळ्याचे अनावरण केले. तसेच त्यांच्या हस्ते नामफलकाचेही अनावरण करण्यात आले. याप्रसंगी बंजारा समाजाच्यावतीने शाह व फडणवीस यांचा पारंपारिक पद्धतीने सत्कार करण्यात आला. यावेळी मोठ्या संख्येने बंजारा समाजाचे नागरिक उपस्थित होते.

हरितक्रांतीचे जनक कै.वसंतराव नाईक यांचा पूर्णाकृती पुतळा नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेने नांदेड शहरातील कै. वसंतराव नाईक चौक परिसरात उभारला आहे. नऊ फूट उंचीच्या या पुतळ्याचे वजन सुमारे ७०० किलो आहे. पुतळ्याच्या उभारणीसाठी रुपये १३ लक्ष ९९ हजार एवढा खर्च आला आहे. २३२.६० चौ.मी. जागेत या पुतळ्याची उभारणी करण्यात आलेली आहे. सुशोभिकरणाचे अंदाजे ६९ लाख रुपयांची कामे आहेत.

# ‘मारून टाक’ ऑडिओ क्लिप प्रकरण तापले

## ‘चालु वार्ता’च्या दणक्यानंतर उदगीरमध्ये खळबळ, तरीही आरोपी मोकाट !

दै.चालु वार्ता वृत्तसेवा
उदगीर - प्रतिनिधी
अविनाश देवकते




**लातूर (उदगीर) :** अमानुषता आणि वैद्यकीय नैतिकतेला तिलांजली देणाऱ्या एका धक्कादायक घटनेने उदगीर शहर हादरले आहे. कोविड काळात एका कोरोना रुग्णाला ‘मारून टाकण्याची चिथावणी’ देणाऱ्या आणि धार्मिक भावना दुखावणाऱ्या उदगीर शासकीय रुग्णालयातील डॉक्टर शशिकांत देशपांडे यांच्याविरुद्ध अखेर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही कारवाई ‘दैनिक चालु वार्ता’ने या प्रकरणाला वाचा फोडल्यानंतर, समाजमाध्यमांतून तीव्र जनक्षोभ उसळल्यानंतर आणि जिल्हाधिकारी व पालकमंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांना निवेदने दिल्यानंतर झाली आहे.

**काय आहे नेमके प्रकरण, ज्याने ’दैनिक चालु वार्ता’ने केले उघड?**

हे प्रकरण २०२१ च्या कोरोनाच्या दुसऱ्या लाटेतील आहे, जेव्हा संपूर्ण महाराष्ट्रात आरोग्य व्यवस्था व्हेंटिलेटरवर होती आणि माणुसकीची सर्वात जास्त गरज होती. अशावेळी उदगीरच्या शासकीय रुग्णालयात घडलेली एक घटना ‘दैनिक चालु वार्ता’च्या हाती लागली आणि आम्ही ती सविस्तरपणे जनतेसमोर आणली. फिर्यादी दायमी अजीमोद्दीन गौसउद्दीन यांच्या पत्नीवर उदगीरच्या कोविड सेंटरमध्ये उपचार सुरू असताना, डॉ. शशिकांत देशपांडे यांनी त्यांचे सहकारी डॉ. शशिकांत डांगे यांच्याशी फोनवर संभाषण केले.

या संभाषणात, जेव्हा डॉ. डांगे यांनी बेड उपलब्ध नसल्याचे सांगितले, तेव्हा डॉ. देशपांडे यांनी संतापजनक उद्गार काढले: ‘दायमीच्या पेशंटला मारून टाक की, कशाला ठेवलेय उगीच, ऑक्सिजन जास्त लागतोय, तुम्हालाः ...चे लई पडलय.‘ ’दैनिक चालु वार्ता’ने हे संभाषण उघडकीस आणले, ज्यात एका रुग्णाला मारून टाकण्याची चिथावणी स्पष्टपणे ऐकू येत होती आणि ’...’ या आक्षेपार्ह शब्दाचा वापर करून मुस्लिम समाजाच्या धार्मिक भावना दुखावल्याचे स्पष्ट होत होते.

**‘दैनिक चालु वार्ता’च्या पाठपुराव्याने जनतेला न्याय !**

सुरुवातीला, फिर्यादीची पत्नी बरी झाल्यामुळे त्यांनी कोणतीही तक्रार दिली नव्हती. मात्र, या संभाषणाची ऑडिओ क्लिप ‘दैनिक चालु वार्ता’ने सविस्तर वृत्तांकन करून समाजमाध्यमांवर व्हायरल केली. या वृत्तामुळे समाजमाध्यमांतून तीव्र प्रतिक्रिया उमटल्या. जनतेने डॉक्टरांच्या या संतापजनक वर्तनाचा निषेध केला आणि त्यांच्यावर कठोर कारवाईची मागणी केली.


दैनिक
चालु वार्ता
Powered by epaper.chaluwartha.com
28 Apr 2025 - Page 3

माणुसकीला काळीमा फासला !

कोविड काळातील धक्कादायक संभाषण व्हायरल

दै.चालु वार्ता वृत्तसेवा
उदगीर - प्रतिनिधी
अविनाश देवकते

लातूर (उदगीर) : कोविडच्या काळात जनतेच्या आरोग्याची जबाबदारी घेतलेल्या डॉक्टरांकडूनच माणुसकीला काळीमा फासल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. दोन डॉक्टरांमधील गुप्त रेकॉर्डिंग सध्या सोशल मिडिया आणि ‘दै. दंडाधिकारी’ या युट्यूब चॅनलवर झपाट्याने व्हायरल होत आहे. या संभाषणाने आरोग्य यंत्रणेवरील विश्वासाला मोठा तडा गेला असून, जनतेमध्ये तीव्र असंतोष उसळला आहे.

व्हायरल क्लिपमध्ये काही डॉक्टरांचे निष्काळजी, बेजबाबदार आणि असंवेदनशील वर्तन उघडकीस आले आहे. महामारीच्या भयावह वातावरणात, जिथे प्रत्येक क्षण जीव वाचवण्याचा होता, तिथे

आरोग्य यंत्रणेवरील विश्वासाला तडा; जनतेत तीव्र असंतोष

काही डॉक्टरांनी निष्काळजीपणाचा आणि बेफिकिरीचा घाणेरडा खेळ केला असल्याचे स्पष्ट दिसते.

‘रुग्णांच्या जीवन-मरणाच्या संघर्षात जेव्हा आधार हवा होता, तेव्हा काहींनी स्वतःच्या स्वार्थासाठी किंवा बेजबाबदारीसाठी रुग्णांना अडचणीत टाकले. ही केवळ डॉक्टर म्हणून नाही, तर माणूस म्हणूनही मोठी गद्दारी आहे!’

असे संतप्त शब्द सध्या शहरात जनतेच्या चर्चेतून व्यक्त होत आहेत.

नागरिकांनी, सामाजिक कार्यकर्त्यांनी आणि विविध संघटनांनी या प्रकरणाची तातडीने उच्चस्तरीय चौकशी करण्याची मागणी केली आहे. दोषींवर कठोरात कठोर कारवाई करावी, अन्यथा तीव्र जनआंदोलन छेडले जाईल, असा स्पष्ट इशाराही दिला आहे.

‘माणुसकीचा विश्वास गमावलेल्यांना माफ करणे हा गुन्हा ठरेल,’ अशी तीव्र भावना नागरिकांमध्ये पसरली आहे.

दरम्यान, आरोग्य प्रशासनावरही गंभीर आरोप होत असून, या प्रकरणात संबंधित अधिकाऱ्यांचीही भूमिका तपासावी, अशी मागणी जोर धरत आहे.

‘मरणाशी झुंजणाऱ्या जनतेच्या वेदनेचा गडद काळा अध्याय, आता लोक विसरणार नाहीत!’

अशी संतप्त भावना जनतेत दाटून आली आहे.

‘ही केवळ एक चूक नाही, हा माणुसकीच्या विश्वासावर झालेला थेट घाव आहे. आता जनता डोळस झाली आहे. गद्दारी करणाऱ्यांना माफ केले जाणार नाही ! आरोग्यसेवेचा पाया मजबूत करायचा असेल, तर प्रथम या विश्वासघातकांना धडा शिकवला पाहिजे !’

‘दैनिक चालु वार्ता’च्या पाठपुराव्यानंतर आणि जनभावनेचा आदर करत, विविध सामाजिक संघटनांनी तसेच नागरिकांनी जिल्हाधिकारी आणि पालकमंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांना निवेदने दिली. या सर्व दबावानंतर, उदगीर शहर पोलिसांनी अखेर डॉ.शशिकांत देशपांडे यांच्याविरुद्ध कलम ११६ (अपप्रेरणा) आणि २९५ अ. भा. द. वि. (धार्मिक भावना दुखावणे) अंतर्गत गुन्हा दाखल केला आहे.

या घटनेने आरोग्य क्षेत्रातील काही व्यक्तींच्या असंवेदनशीलतेचा पर्दाफाश केला आहे. ‘दैनिक चालु वार्ता’ने या प्रकरणाला सातत्याने उचलून धरल्याने आणि जनक्षोभाला वाट मोकळी करून दिल्यानेच अखेर न्याय मिळाला आहे. आता या प्रकरणाचा सखोल तपास होऊन दोषींवर कठोर कारवाई होते का, याकडे संपूर्ण जिल्ह्याचे लक्ष लागले आहे. ’दैनिक चालु वार्ता’ या प्रकरणावर पुढील काळातही बारकाईने लक्ष ठेवेल आणि प्रत्येक अपडेट वाचकांपर्यंत पोहोचवेल.

# बाजारात पावडरने पिकविलेले आंबे

## खाल तर आरोग्य बिघडणार; आमरसही धोकादायक, पावसामुळे भावात घसरण

दै.चालु वार्ता वृत्तसेवा
वाशिम/रिसोड - प्रतिनिधी
भागवत घुगे



**वाशिम/रिसोड :** सध्या बाजारपेठेत फळांचा राजा फेब्रुवारीत दाखल झाला आहे. फळात पिकण्याची योग्य ती नैसर्गिक प्रक्रिया होण्याआधीच कार्बाइडने पिकवून बाजारात आणलेले आंबे मोठ्या प्रमाणात खरेदी करण्यावर ग्राहक भर देत आहेत. त्यामुळे नैसर्गिक पद्धतीने पिकविलेले आंबे खरेदी करूनच त्याचा आमरस खा, अन्यथा मोठ्या प्रमाणात आमरस खाणे आरोग्यास हानिकारक आहे, असे तज्ज्ञांचे मत आहे. यंदा फेब्रुवारीमध्ये केसर, बदाम, दसेरी, पेवनदी, तोतापुरी, बैगनपल्लीसह अन्य आंबे बाजारात दाखल झाले आहेत. परंतु, पावसामुळे भावात घसरण. सध्या बाजारपेठेत सर्व प्रकारचे आंबे दाखल झाले आहेत, मात्र, यात सर्वाधिक कार्बाइडने पिकविलेले आंबे मिळत आहेत. त्यामुळे नैसर्गिक पद्धतीने पिकविलेल्या आंब्यांना चांगला भाव आहे. तरीही नागरिक खरेदी करीत आहेत. परंतु, आगामी महिन्यात हेभाव कमी होणार असल्याचे व्यापाऱ्यांकडून सांगितले जात आहे

नैसर्गिक पद्धतीने पिकविलेले आंबे बाजारात कमी प्रमाणात आहेत. त्यामुळे गावरान आंबे सध्यातरी महाग मिळत आहे. हे कलमी आंबे कार्बाइडने पिकवून बाजारात आणलेली असतात. त्यामुळे हे आंबे खाल्ल्यानंतर त्याचे आरोग्याव अनेकवेळा वाईट परिणाम होत असतात. म्हणूनच ग्रामीणमध्ये नैसर्गिक पद्धतीने पिकविलेले आंबे खाण्यावर भर दिला जातो.

नैसर्गिक प्रक्रिया होण्याआधीच कार्बाइडने पिकवून आणलेले आंबे खरेदी करण्यावर ग्राहक भर देत आहेत. मात्र अनेकजण नैसर्गिक पद्धतीने पिकविलेले आंबे खाण्यावर भर देत असतात. आता कार्बाईडने पिकविलेले आंबे दाखल झाले आहेत. त्यावर अद्याप अन्न व औषधी प्रशासनाकडून कारवाई करण्यात आलेली नाही. दिवसेंदिवस गावरान आंब्यांचे प्रमाण कमी होत आहे. आजकाल प्रत्येकाला झटपट फळ लागणारी झाडे हवी आहेत. त्यामुळे कलमी आंब्यांचे प्रमाण वाढले आहे. यात गावरान आंबे उशिरा येतात. त्यामुळे कार्बाइडने पिकविलेले आंबे बाजारात दाखल झालेले असतात. शहरी भागातील नागरिक सुरुवातीला त्यावरच ताव मारतात. गेल्या पंधरादिवसापासून पाऊस सुरूअल्याने भावात घसरण झाली आहे.

# हिंदूधर्मरक्षिका महाराणी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचं सर्वात उंच स्मारक जालन्यात

## उत्सव वस्त्रोद्योगमंत्री संजय सावकारे यांनी दिली ग्वाही

### अहिल्यादेवी होळकर स्मारकासाठी राज्य शासन सर्वतोपरी सहकार्य करेल

दै.चालु वार्ता वृत्तसेवा
जालना - प्रतिनिधी
आकाश माने

**जालना :** पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या त्रिशताब्दी जयंती वर्षानिमित्त महाराष्ट्रात विविध सांस्कृतिक आणि सामाजिक उपक्रमांचे आयोजन केले जात आहे. याच पार्श्वभूमीवर, जालना शहरात पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचे स्मारक उभारण्यात येत आहे. या स्मारकामुळे जालना शहर पर्यटन आणि सांस्कृतिक केंद्र म्हणून ओळखले जाईल. या स्मारकासाठी शासन स्तरावर सर्वतोपरी सहकार्य केले जाईल, अशी ग्वाही वस्त्रोद्योगमंत्री संजय सावकारे यांनी दिली.

जालना शहरातील अंबड चौफुली परिसरात उभारण्यात येत असलेल्या ‘हिंदूधर्मरक्षिका महाराणी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर स्मारकाची’ वस्त्रोद्योग मंत्री संजय सावकारे यांनी पाहणी केली. या प्रसंगी आमदार नारायण कुचे, भास्कर दानवे, बद्रीनाथ पठाडे, भगवान मात्रे, स्मारक समितीचे अध्यक्ष कपिल दहेकर, शांतीलाल बनसोडे यांच्यासह विविध समाजबांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते. ही भिंत स्मारकाचे विशेष आकर्षण ठरणार आहे. या भव्य प्रकल्पासाठी आणि सुशोभीकरणासाठी शासन सकारात्मक असून सर्वतोपरी सहकार्य करेल. दरम्यान, स्मारक समितीचे अध्यक्ष कपिल दहेकर म्हणाले, हे स्मारक अहिल्यादेवींच्या कार्याचा आणि त्यांच्या समाजसुधारणेच्या विचारांचा गौरव आहे. यामुळे जालना शहराचे सांस्कृतिक वैभव वाढेल आणि भावी पिढ्यांना प्रेरणा मिळेल. या स्मारकाच्या माध्यमातून जिल्ह्याच्या नावलौकिकात मोठी भर पडणार आहे. याशिवाय हे स्मारक राज्यात खऱ्या अर्थाने लक्षवेधी ठरेल. देशातील सर्वात उंच म्हणून या स्मारकाला दर्जा मिळणार आहे. यातून या जिल्ह्याच्या विकासात निश्चितपणे मोठी भर पडल्याचे चित्र निर्माण होईल. यामुळे या स्मारकाच्या उभारणीसाठी राज्य शासनाच्या वतीने सर्वोतोपरीने सहकार्य केले जाईल. यातून हे स्मारक होईल, असेही ते म्हणाले.

**देशातील सर्वात उंच स्मारक जालन्यात; इतर सजावटही**

मंत्री संजय सावकारे म्हणाले, जालना शहराचा सांस्कृतिक आणि ऐतिहासिक वारसा समृद्ध करणारे २४ फूट उंचीचे हे स्मारक देशातील सर्वात उंच अहिल्यादेवी होळकर स्मारक ठरणार आहे. वैभवशाली इतिहासाची साक्ष देणारे आहे. या स्मारकाच्या पार्श्वभूमीला ऐतिहासिक महेश्वर किल्ला आणि इंदूर राजवाड्याच्या संकल्पनेचा मिलाफ साधणारी २८ फूट उंच आणि ५६ फूट रुंद दगडी भिंत उभारली जाणार आहे.

# जिर्ण झालेले विद्युत पोल तात्काळ बदला - नुमान चाऊस

## माजलगाव शहरात विज वितरण कंपनीचे दुर्लक्ष

दै.चालु वार्ता वृत्तसेवा
माजलगांव - प्रतिनिधी
नाजेर कुरेशी

**माजलगाव :** माजलगाव शहरातील विविध भागातील विद्युत वाहक पोल हे जिर्ण झाले आहेत. त्यामुळे ते कोसळून जिवीत हानी होऊ शकते. त्या करीता विज महावितरण कंपनीने हे जिर्ण झालेले विद्युत पोल बदलून पर्यायी पोल उभरावे अशी मागणी मौलाना आझाद युवा मंचचे बीड जिल्हा अध्यक्ष नुमान अली चाऊस यांनी केली आहे. माजलगाव शहरातील मुख्य रस्त्यासह गल्ली बोळातील विद्युत पोल हे अनेक वर्षापासून बदलण्यात न आल्याने ते जिर्ण झालेले आहेत. त्यामुळे वाकडे पोल केंव्हाही कोसळून जिवीत हानी होऊ शकते. त्यामुळे प्रामुख्याने माजलगाव शहरातील मोगल मोहल्ला व अरब गल्ली इतर वार्डातले भागात विज वाहक पोल हे जमिन लेवलला जिर्ण झाले असून ते धोकादायक ठरण्याची शक्यता आहे. परंतू महावितरण कंपनीला या विद्युत वाहक पोल बदलने व जिर्ण झालेल्या तारा बदलण्यात कसल्याच प्रकारे कर्तव्य जाणून येत नाही. तरी तात्काळ महावितरण कंपनीने हे जिर्ण झालेले विद्युत पोल बदलावेत अन्यथा काही अनुचित प्रकार घडल्यास या सर्व प्रकारास महावितरण कंपनीचा अनागोंदी कारभार कारणीभूत ठरणार आहे. तात्काळ हे पोल बदलावे व भविष्यात होणारी जिवीत हानी व अनुचित प्रकार महावितरण कंपनीने टाळावा अशी मागणी मौलाना आझाद युवा मंचचे जिल्हा अध्यक्ष नुमान अली चाऊस यांनी प्रसिद्ध पत्रकाव्दारे कळविले आहे.



(पान १ वरून...)

## वक्फ कायद्याच्या विरोधात हिंदू बांधवांनी...

अल्लाहसाठी जमिनी वक्फ केल्या. त्या कोणाच्या मालकीच्या नाहीत. या जमिनींचा वापर इस्लामसाठीच होईल. भावी पिढ्या त्या जमिनींचा वापर करतील. कब्रस्तान कुठून आणायचे ? लोकसभेत मंजूर कायद्याचा आढावा घेण्याचा अधिकार सर्वोच्च न्यायालयाला आहे. न्यायमूर्तींनाही भाजप नेते धमकावत आहेत.

**आ.पाठीशी खंबीरपणे उभे**

‘वक्फ’च्या या काळ्या कायद्याच्या विरोधात काँग्रेसने लोकसभेत ताकदीने विरोध केला. जोपर्यंत सरकार हा कायदा माघारी घेणार नाही, तोपर्यंत लढा सुरूराहील. आम्ही तुमच्या पाठीशी खंबीरपणे उभे आहोत.

- खा. कल्याण काळे

**संविधानाची चौकट तोडली**

वक्फ नव्या कायद्याच्या माध्यमातून गरीब मुस्लिमांचा उद्धार करणार, असे सरकार सांगत आहे. हे खोटे आहे. जुन्या कायद्यानुसारसुद्धा उद्धार करता आला असता. संविधानाच्या चौकटीत हा कायदा नाही. कलम २४, ३६ चे उल्लंघन होत आहे.

**– मौलाना मलिक मोहतसीम**

# होलार समाज संघटनेच्या वतीने गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार समारंभ संपन्न

दै.चालु वार्ता वृत्तसेवा
माळशिरस - प्रतिनिधी
राजेंद्र पिसे



**नातेपुते :** सालाबाद प्रमाणे याही वर्षी अखिल भारतीय होलार समाज संघटना शैक्षणिक विभागाच्या वतीने गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार समारंभ संत सावतामाळी मंगल कार्यालय या ठिकाणी मोठ्या उत्साहामध्ये संपन्न झाला. मान्यवरांच्या हस्ते प्रतिमेचे पूजन करण्यात आले. आलेल्या मान्यवरांचा संघटनेच्या वतीने सत्कार करण्यात आला. कार्यक्रमास आलेल्या पाहुण्यांचे राज्य उपाध्यक्ष सुनील ढोबळे यांनी स्वागत केले. विशेष सत्कारमूर्ती म्हणून प्राची गोरवे (जलसंधारण अधिकारी वर्ग २) सौरभ ढोबळे (सिव्हिल इंजिनिअर असिस्टंट बां.वि.) निखिल गेजगे (जूनियर अकौटंट) ॲड भारत गोरवे (नोटरी भारत सरकार) सतीश सपकाळ (मा सदस्य जिल्हा नियोजन समिती) महेश केंगार (M.B.B.S) यांचा संघटनेच्या वतीने सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे मार्गदर्शक राकेश बेद (व्यवस्थापकीय संचालक, संत रोहिदास चर्मउद्योग आर्थिक विकास महामंडळ मुंबई) कार्यक्रमाचे अध्यक्ष नंदकुमार केंगार, नायब तहसीलदार सिद्धनाथ जावीर, प्र गट शिक्षणाधिकारी सुषमा महामुनी, प्रदेशाध्यक्ष रणजीत ऐवळे, राष्ट्रीय सचिव हैदर केंगार, राज्य सचिव मधुकर भंडगे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. संघटनेच्या वतीने यंदाचा दिला जाणारा समाजभूषण पुरस्कार विजय हेगडे गुरुजी यांना देण्यात आला.इयत्ता दहावी प्रथम, द्वितीय, तृतीय इयत्ता बारावी प्रथम, द्वितीय, तृतीय व पदवीधर यांना संघटनेच्या वतीने ट्रॉफी व सन्मानपत्र देऊन त्यांचा गौरव करण्यात आला.तसेच संघटनेच्या वतीने देणगीदारांचा सत्कार करण्यात आला. प्रास्ताविक- शिक्षण विभागाचे प्रमुख ज्ञानेश्वर गुळीग यांनी केले.व सूत्रसंचालन शिक्षण विभागाचे सचिव किसनराव ढोबळे यांनी केले. या कार्यक्रमास ज्येष्ठ मार्गदर्शक चंद्रकांत गुळीग, हनुमंत शेलार, महादेव केंगार,रंगनाथ गोरवे राष्ट्रीय प्रसिद्धीप्रमुख दिपक ऐवळे, शिक्षण सम्राट सी.डी. ढोबळे जिल्ह्याचे नेते पांडुरंग गेजगे, मुन्ना केंगार, सचिन गुळग, रघुनाथ ऐवळे,प्रभाकर ऐवळे पश्चिम महाराष्ट्र संपर्कप्रमुख बाजीराव केंगार,तालुकाध्यक्ष शिवाजीराव होनमाने, हनुमंत बिरलिंगे, बापूराव ऐवळे, प्रणील केंगार,पत्रकार गणेश करडे, विकास केंगार, तुकाराम कांबळे, दादा बिरलिंगे व गुणवंत विद्यार्थी त्यांचे पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते. आभार दिनेश जावीर यांनी मांडले.

लोकजीवन बहुउद्देशीय ग्रामीण विकास सेवाभावी संस्थाव्दारा संचलित

**लोकराजा अध्यापक विद्यालय**

रोकडा सावरगाव, ता. अहमदपूर, जि. लातूर

(कायम विनाअनुदानित)

**पाहिजेत**

लोकजीवन बहुउद्देशीय ग्रामीण विकास सेवाभावी संस्थाव्दारा संचलित लोकराजा अध्यापक विद्यालय, रोकडा सावरगाव, ता. अहमदपूर, जि. लातूर येथील खालील पदाची नियुक्ती करणे आहे. गरजू व पात्र उमेदवारांनी दि. ३१.०५.२०२५ रोजी सकाळी ११.०० वाजता लोकराजा अध्यापक विद्यालय, रोकडा सावरगाव, ता. अहमदपूर, जि. लातूर येथे शैक्षणिक प्रमाणपत्राच्या मुळ प्रती व २ पासपोर्ट सह उपस्थित रहावे.

| अ.क्र. | पद | रिक्त पद | विषय | शैक्षणिक पात्रता | अनुभव |
|---|---|---|---|---|---|
| १ | प्राचार्य | ०१ | शिक्षणशास्त्र (पुर्णवेळ) | एम.ए. एम एड/ एम.ए. शिक्षणशास्त्र | ५ वर्ष |
| २ | पायाभुत शिक्षक | ०१ | शिक्षणशास्त्र | एम.ए. एम एड/ एम.ए. शिक्षणशास्त्र | ३ वर्ष |
| ३ | सहशिक्षक | ०१ | विज्ञान/गणित | एम.एस. सी. बी.एड/एम.एड. | ३ वर्ष |
| ४ | सहशिक्षक | ०३ | **सामाजिक शास्त्र** (इंग्रजी, भुगोल, मराठी, इतिहास, हिंदी) | एम.ए. बी.एड/एम. एड | ३ वर्ष |
| ५ | शारिरीक शिक्षक | ०१ | शारिरीक शिक्षण | बी.पी.एड/एम.पी.एड | ३ वर्ष |
| ६ | कला शिक्षक | ०१ | कला शिक्षण | एटीडी. ए.एम. | ३ वर्ष |
| ७ | ग्रंथपाल | ०१ | – | बी.लिप./एम.लिप. | २ वर्षे |
| ८ | लिपिक | ०१ | – | कोणतीही पदवी व मराठी ३०, इंग्रजी ४० टायपिंग व MS-CIT | २ वर्षे |
| ९ | संगणक चालक | ०१ | – | बी.सी.ए./एम.सी.ए.व MS-CIT | २ वर्षे |
| १० | सेवक | ०१ | – | ७ वी पास | – |

नोट.

१. उमेदवारांनी आपले अर्ज व कागदपत्रेसह दि. ३१-०५-२०२५ रोजी सकाळी ठिक. ११.०० वा. स्वखर्चाने लोकराजा अध्यापक विद्यालय, रोकडा सावरगाव, ता. अहमदपूर, जि. लातूर येथे उपस्थित रहावे.

२. डी.ए./टी.ए. संस्थेतर्फे दिले जाणार नाही.

**अध्यक्ष**
लोकजीवन बहुउद्देशीय ग्रामीण विकास सेवाभावी संस्था,
रोकडा सावरगाव, ता. अहमदपूर, जि. लातूर

**सचिव**
लोकजीवन बहुउद्देशीय ग्रामीण विकास सेवाभावी संस्था,
रोकडा सावरगाव, ता. अहमदपूर, जि. लातूर


# ‘१४ गावं, ३ महिने अंधारात

## - महाविरणला झोप कधी येणार?’

दै.चालु वार्ता वृत्तसेवा

उदगीर - प्रतिनिधी

अविनाश देवकते




**‘मादलापूरचे गावकरी उंबरठ्यावर – २० दिवसांत वीज नसेल तर स्वत:ला पेटवू !’**

**लातूर (उदगीर) :** महावितरणच्या गलथान आणि बेफिकीर कारभारामुळे मादलापूरसह १४ गावांतील जनतेचे जनजीवन उध्वस्त झाले आहे. तब्बल तीन महिन्यांपासून सतत अघोषित भारनियमन, मनमानी नियोजन आणि अधिकाऱ्यांच्या उदासीनतेने त्रस्त ग्रामस्थांनी आता थेट आत्मदहनाचा इशारा दिला आहे. विशेषत: मादलापूरमधील संतप्त ग्रामस्थांनी ‘आमच्या संयमाची परीक्षा पाहू नका, अन्यथा परिणाम गंभीर असतील’ असा थेट इशारा महावितरण अधिकाऱ्यांना दिला आहे.

**महावितरणच्या अधिकाऱ्यांचे ‘डोळस अंधत्व’**

मादलापूरसह १४ गावांचा वीजपुरवठा एकाच योजनेशी जोडणे ही महावितरणच्या अकार्यक्षमता आणि अर्धवट नियोजनाची जिवंत उदाहरणे आहेत. एका गावात बिघाड झाला तरी संपूर्ण परिसर अंधारात जातो, ही कुठली योजना? की ही योजना ग्रामस्थांना अंधारात लोटण्याचीच? महावितरणचे अधिकारी फक्त टेबलावरच्या नकाशावर योजना आखतात, प्रत्यक्षात जनतेच्या वेदना आणि अडचणी यांच्याशी त्यांना काही देणेघेणे उरलेले दिसत नाही.

**‘शासकीय दप्तरखान्यात आम्ही मरणार का?’**

ग्रामस्थांनी वारंवार तक्रारी करूनही महावितरणच्या कार्यालयात फक्त आश्वासनांचा पाऊस पडतो; कृती मात्र शून्य. ना नियमित वीज, ना पिण्याचं पाणी, ना गिरण्या सुरू– मग हे अधिकारी पगार कशाचा घेतात? जनतेला अंधारात ठेवून महावितरणच्या अधिकाऱ्यांनी आपले डोळस अंधत्व दाखवले आहे, असा आरोप ग्रामस्थ करत आहेत.

**पावसाळ्यात धोका वाढला, महावितरण मात्र ‘पावसाळी झोपेत’**

सांजवेळी अंधारात चालताना साप, विंचवाचा धोका वाढला आहे. पण महावितरणच्या अधिकाऱ्यांना याचं गांभीर्य नाही. गाव अर्बन क्षेत्रात असूनही, वीजसेवा ग्रामीण भागाहूनही वाईट – हे महावितरणच्या व्यवस्थापनाचं अपयश नाही का?

**ग्रामस्थांची स्पष्ट मागणी, अन्यथा तीव्र आंदोलन**

**ग्रामस्थांनी महावितरणसमोर पुढील स्पष्ट मागण्या ठेवल्या आहेत :**

✻ मादलापूरचा वीजपुरवठा इतर १३ गावांपासून स्वतंत्र करावा.

✻ नियमित व सलग वीजपुरवठा त्वरित सुरूकरावा.

✻ पूर्वीप्रमाणे २४ तास वीज त्वरित उपलब्ध करून द्यावी.

**२० दिवसांची मुदत, नंतर आत्मदहन**

या मागण्या येत्या २० दिवसांत पूर्ण न झाल्यास, महावितरण कार्यालयासमोर आत्मदहन केल्यास त्याला जबाबदार कोण? – हा प्रश्न आता सरकार आणि प्रशासनासमोर उभा आहे. ‘महावितरणने वेळेत जागे व्हावे, अन्यथा या निष्क्रीय अधिकाऱ्यांविरुद्ध मोठे जनआंदोलन उभारण्यात येईल,‘ असा इशारा ग्रामस्थांनी दिला आहे.

# अंबड तालुक्यातील घरकुल पात्र धारकांना प्रत्येकी पाच ब्रास रेती मोफत देण्यात येणार

दै.चालु वार्ता वृत्तसेवा

अंबड - प्रतिनिधी

ज्ञानेश्वर साळुंके




**अंबड :** मा.महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या आदेशानुसार तसेच महाराष्ट्र शासनाचे शासन निर्णय दिनांक ८ एप्रिल २०२५ व ३० एप्रिल २०२५ अन्वये जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ यांच्या मार्गदर्शनाखाली अंबड तालुक्यातील पात्र घरकुलधारकांना पाच ब्रास रेती मोफत उपलब्ध करून देण्यात येणार आहे. पात्र लाभार्थी यांनी तलाठी ग्रामसेवक यांच्यामार्फत किंवा स्वतःही स्वत:चा आधार क्रमांक मोबाईल क्रमांक व घरकुल मंजुरीची यादी चा क्रमांक अपलोड केल्यानंतर सदरील पात्र लाभार्थ्यांना तहसीलमार्फत मोफत ई पास देण्यात येणार आहे. आणि त्यांनी त्यांना असलेल्या नजीकच्या वाळूघाटापासून पसंती क्रमांक दिल्यास त्या वाळू घाटावरून त्यांची ओळख पटवून त्यांना पाच ब्रास रेती मोफत उपलब्ध करून देण्यात येणार आहे. अंबड तालुक्यातील जवळपास पंधरा हजार पाचशे लाभार्थी असून त्यांच्या याद्या गावनिहाय तलाठी, मंडळ अधिकारी ग्रामसेवक यांना देण्यात आलेले आहेत. त्याचबरोबर त्यांच्याकडून अर्ज भरून घेण्याकरता गटविकास अधिकारी यांच्यामार्फत ग्रामसेवक यांना सांगण्यात आलेले आहे. तलाठी, मंडळ अधिकारी यांची बैठक घेऊन पात्र लाभार्थ्यांना मार्गदर्शन करण्याकरता चे सर्व माहिती इत्यंभूतपणे देण्यात आलेली आहे .सदर योजना ही १० जून २०२५ पर्यंत असल्याने सर्व पात्र लाभार्थ्यांनी आपले वाहन व भरण्याकरता साहित्य घेऊन मंजुरी झाल्यानंतर रेती उपलब्ध करून घ्यायची आहे.सदर योजनेचा जास्तीत जास्त लोकांनी लाभ घ्यावा याविषयी आवाहन करण्यात येते. त्याबरोबर शासकीय यंत्रणांना शासकीय कामांना रेतीची मागणी झाल्या नुसार बारा हजार आठशे ब्रास रेती त्यांना उपलब्ध करून देण्यात येत आहे .अंबड तालुक्यातील १० रेती घाटावरून सदरची रेती उपलब्ध करून देण्यात येणार असून याचा सर्वांनी लाभ घ्यावा असे आवाहन करण्यात येत आहे...


उपरोक्त संदर्भ अन्वये मा.आमदार नारायण कुचे विधानसभा सदस्य बदनापूर यांनी उपस्थिती लावून उपरोक्त शासन निर्णयानुसार पात्र घरकुलधारकांना मोफत पाच ब्रास रेती देण्यात येणार असून सदर योजनेचा जास्तीत जास्त लोकांनी फायदा घ्यावा असे आवाहन केले. त्याचबरोबर उपस्थित सर्व अधिकारी कर्मचारी तथा सरपंच यांना सुद्धा सविस्तर मार्गदर्शन केले. सदर वेळी तहसीलदार विजय चव्हाण, गटविकास अधिकारी उदय राजपूत, मुख्याधिकारी उकिरडे मनोज, नायब तहसीलदार विश्वास धर्माधिकारी, सार्वजनिक बांधकाम विभागाचे उप अभियंता दगुला व इतर प्रतिष्ठित नागरिक उपस्थित होते.

# आळंदी मरकळ रोडवरील जीवघेणा खड्डा देतोय मृत्यूला आमंत्रण

दै.चालु वार्ता वृत्तसेवा

पिंपरी चिंचवड - प्रतिनिधी

बद्रीनारायण घुगे




**आळंदी :** आळंदी मरकळ रस्त्यावर आळंदी नगरपालिका हद्द व चरोली खुर्द ग्रामपंचायत हद्द यांच्या कात्रीत सापडलेला हा रस्ता गेली अनेक वर्षांपासून दुर्लक्षित असून, येथे वाहन चालकांना कमालीची कसरत करून, खड्डा पार करावा लागतो, मात्र याकडे तात्पुरती माती वजा मुरूम टाकून तो बुजवला जातो, परंतु काही दिवसातच पुन्हा परिस्थिती जैसे थे होती. गेली आठवडाभर आळंदी मध्ये पाऊस सुरूअसून, खड्ड्याची खोली वाढत चालली आहे, त्यामुळे वाहन चालक, व नागरिकांचे कंबरडे या ठिकाणी मोडत आहे, तरी प्रशासनाने हद्दीचा वाद बाजूला ठेवून, कायमस्वरूपी या खड्ड्यावर पेविंग ब्लॉक बसवावेत अशी मागणी ॲड. नाझीम शेख यांनी संबंधितांकडे केली आहे. फेविंग ब्लॉक ऐवजी या ठिकाणी गतिरोधक बसवला तरी चालेल असेही निवेदनात म्हटले आहे. यापुढे या खड्ड्याचा प्रश्न दोन्ही प्रशासनाने ऐरणीवर न ठेवता सदरील रस्ता सुस्थितीत करून द्यावा अशी ही मागणी नागरिक व वाहन चालक करीत आहेत.

## नगरपालिका ग्रामपंचायत हद्दीवादातून वर्षानुवर्षे या खड्ड्याचा प्रश्न ऐरणीवर

**काही दिवसांत संत ज्ञानेश्वर महाराज पालखी सोहळ्याला महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून भाविक येतात या रस्त्यावरून वाहने येतात त्या सुध्दा त्रास सहन करावा लागतो त्यामुळे तात्पुरती डागडुजी करावी अशी नागरिकांची मागणी होत आहे या खड्ड्यात कायम ची दुरुस्ती करावी.**

**सोमनाथ लोखंडे, मरकळ**

# लॉर्ड व्यंकटेश्वरा पब्लिक स्कूलची सैनिकी स्कूल परीक्षेत गगन भरारी

दै.चालु वार्ता वृत्तसेवा

शिराढोण - प्रतिनिधी

गजानन देवणे



**शिराढोण :** राष्ट्रीय परीक्षा एजन्सी व्दारा घेतली जाणारी राष्ट्रीय सैनिकी स्कूल प्रवेश परीक्षेत शिराढोण येथील लॉर्ड व्यंकटेश्वरा पब्लिक स्कूलचे पहिल्याच वर्षात दोन पैकी दोन्ही विद्यार्थी पात्र झाले असून त्यामध्ये प्रसाद रामराव पांडागळे – १८० गुण अमित भगवान पांडागळे १४१ गुण घेऊन सैनिकी स्कूल परीक्षेत पात्र ठरले आहेत. दोन्ही विद्यार्थ्यांचा शाळेचे कार्यकारीसंचालक तथा प्राचार्य लक्ष्मण पांडागळे सर तसेच सहशिक्षक शिराळे सर, शितल पांडागळे मॅडम, संतोष कुंभारे सर, शिवकन्या चावरे मॅडम, नाजमा मुंजेवार मॅडम, प्रणिता नांदेडे मॅडम व शिक्षकेतर कर्मचारी तथा पालकांकडून अभिनंदन करण्यात आले.

(पान १ वरून...)

## मोदी सरकासाठी काम करताय का ...

नसल्याची चर्चा होती. त्यातच केंद्र सरकारच्या इच्छेनुसार थरूर भारतीय शिष्टमंडळाबरोबर परदेशात गेले आहेत. त्यामुळे थरूर यांना त्यांच्या उद्देशांबाबत प्रश्न विचारण्यात आला होता. मात्र, ‘मी सरकारसाठी काम करत नाही, मी विरोधी पक्षात आहे’, असं त्यांनी स्पष्ट केलं.

**थरूर यांचा पाकिस्तानवर हल्लाबोल**

शशी थरूर यांनी न्यूयॉर्कमधील भारताच्या वाणिज्य दूतावासात अमेरिकेतील थिंक टँक व प्रसारमाध्यमांशी बातचीत केली. यावेळी त्यांनी वेगवेगळ्या प्रश्नांना उत्तरं दिली. थरूर म्हणाले, पाकिस्तान भारताची जमीन बळकावण्यासाठी सातत्याने भारतीय हद्दीत दहशतवादी हल्ले घडवून आणत आहे. २२ एप्रिल रोजी पहलगाममध्ये झालेल्या हल्ल्याचं प्रमुख उद्दीष्ट देखील त्याचाच एक भाग होतं. जम्मू-काश्मीरची शांतता भंग करणे, तिथे तणाव निर्माण करणे आणि भारतात हिंसाचार करणे हे त्या हल्ल्याचं उद्दीष्ट होतं. त्या दहशतवाद्यांनी हिंदू नागरिकांना गोळ्या घातल्या.


**CHANGE IN NAME**

My (Old Name) is **Gulam Sameer Pasha**, Which Now I am Changing as (New Name) **Mohammed Gulam Sameer Pasha,** Hence, forth my all correspondence will be done as per my New Name. Please Consider the same.

Sign by
**Mohammed Gulam Sameer Pasha**
9-7-1667/1, Mohsin Colony,
Opp. Umar Farooq Urdu High School,
Nanded. 431604.


## भूवैकुंठ पंढरी – पुष्प १२३ वे –

वाढला सोहळा मार्ग झाले दोन । तितकीच गर्दी दोन्ही मार्गांहून ।।
एका बीजाचेच बहरले वृक्ष । जेथे जाय बीज तेथे नवे वृक्ष ।।
दाही दिशांतून येती दिव्य संत । त्यांच्या मागोमाग बहू भाग्यवंत ।।
धरेचा कणकण गातसे नाम । आनंद व्यापला कृष्ण हरि राम ।।

**– आनंद**

**अर्थ :** महाराष्ट्राच्या मातीत संतविचार एवढा रुजला की घराघरात वारकरी तयार झाले. त्यामुळे सोहळा एवढा वाढला की पुढे एका मार्गाचे दोन मार्ग करावे लागले. दोन मार्ग करूनही दोन्हीकडे तितकीच गर्दी पहायला मिळते. संतांनी भगवंताच्या नामाचे बीजारोपन केले आणि त्याचेच पुढे विशालकाय वृक्ष निर्माण झाले. जेथे जेथे हे नामबीज पोचले तेथे तेथे नवे वृक्ष निर्माण झाले. संत परंपरा प्रचंड बहरली. महाराष्ट्र ही संतांची भूमी म्हणून ओळखली जाऊ लागली. सर्व संतांच्या कर्मभूमीतून प्रचंड मोठे पालखी सोहळे पंढरपूरच्या दिशेने येऊ लागले. संतांच्या मागोमाग घराघरांतून भाविक मंडळी गात नाचत पंढरपूरच्या दिशेने धाऊ लागले. इथल्या मातीचा कणकण भगवंताचे नाम गाऊ लागला. हा नामघोष आसमंतात दुमदुमला.

**ह भ प आनंद महाराज काकडे,**
**बनसारोळा ८८०५५५०३१५**

## चुटकुले

एक दारुड्या लोळून गाणी म्हणत असतो.
मग तो उलटा होऊन परत गायला सुरुवात करतो.
शेजारून चाललेला एक माणूस – हे काय?
दारुड्या – कॅसेटची दुसरी बाजू लावलीय:

## दै.चालु वार्ता, वृत्तसेवा — आयपीएल T20 २०२५ सध्याची स्थिती

| TEAMS | P | W | L | NR | PTS | NRR |
|---|---|---|---|---|---|---|
| GT | 14 | 9 | 4 | 1 | 19 | 0.372 |
| RCB | 14 | 9 | 5 | 0 | 18 | 0.254 |
| PBKS | 13 | 8 | 4 | 1 | 17 | 0.255 |
| MI | 14 | 8 | 6 | 0 | 16 | 1.142 |
| DC | 14 | 7 | 6 | 1 | 15 | 0.011 |
| KKR | 14 | 6 | 7 | 1 | 13 | -0.241 |
| LSG | 13 | 6 | 7 | 0 | 12 | -0.337 |
| SRH | 14 | 5 | 7 | 2 | 12 | -0.305 |
| RR | 14 | 4 | 10 | 0 | 8 | -0.549 |
| CSK | 14 | 4 | 10 | 0 | 8 | -0.647 |


This Daily Printed, Published and Owned by **Dnyanoba Sudhakar Lokhande Patil** Printed at Girish Printers and Paper Converters, 150, Shaniwar Peth, Near Amruteshwar Mandir, Pune (M.S.)-411030 and Published at Flat No.806, 8 th Floor, Ratan Neptune, Handewadi Road, Hadapsar, Pune (M.S.)-411028 ■ **Editor : Dnyanoba Sudhakar Lokhande Patil** ■ Mob No.: **9373504748** ■ Email **dainikchaluwartha@gmail.com** ■ RNI No.: MAHMAR/2021/82895 (JURISDICTION AT PUNE)

हे वृत्तपत्र मालक, मुद्रक, प्रकाशक **श्री.ज्ञानोबा सुधाकर लोखंडे पाटील** यांनी गिरीष प्रिंटर्स अँड कन्व्हर्टर्स, १५०, शनिवार पेठ, अमृतेश्वर मंदिराजवळ, पुणे (महाराष्ट्र)- ४११०३० येथे छापून फ्लॅट नं.८०६, ८ वा मजला, रतन नेपच्युन, हंडेवाडी रोड, हडपसर, पुणे (महाराष्ट्र)-४११०२८ येथून प्रकाशित केले. ■ **संपादक - श्री.ज्ञानोबा सुधाकर लोखंडे पाटील** ■ मो.नं.**9373504748** ■ Email - **dainikchaluwartha@gmail.com** ■ RNI No.: MAHMAR/2021/82895 (सर्व वाद पुणे न्याय कक्षेत)

# भाषण ही कला आहे

भाषण ही कला आहे, काही जणांकडे उपजत असते. काही ती कमावतात.

काही जणांचे भाषण ऐकायला लोक काम धंदा सोडून धाव घेतात. तर काहींचे भाषण सुरूझाले कि लोक चुळबूळ करूलागतात. टिव्हीवर चालू असेल तर वाहिनी बदलली जाते.

सामान्यांवर सहसा भाषणाची वेळ येत नाही. पण यातल्या काहींना हौस दांडगी असते.

मग संधी मिळाली कि ही हौस भागवून घेतली जाते. घरगुती कार्यक्रम असेल किंवा सध्या निवडणुकीच्या काळात उमेदवाराची चतुराई म्हणून प्रचारफेरीत तिथल्याच एखाद्याला झाडावर चढवून दोन शब्द बोलायला सांगणे असेल, जो वाटच बघत असतो त्याला ती पर्वणीच कि !

**अशाच काही भाषणांचे हे किस्से**

**श्रद्धांजली**

ज्या घरात हा कठीण प्रसंग ओढवलेला असतो तिथे वातावरण गंभीर असतं. उघड किंवा सुप्त असे शोकाकुल वातावरण असते. लोक भेटायला येत असल्याने भावनांना आवर घालावा लागतो. घराचा ताबा हा नातेवाईकांकडे गेलेला असतो. मग कुणी तरी श्रद्धांजलीचा कार्यक्रम ठेवतं. परस्पर निरोप जातात. घरच्या मोठ्या व्यक्तीला कल्पना दिली जाते. ऐन वेळी कळते कि भाषणे होणार आहेत. मग जे कुणी गुरूजी असतील त्यांना पाच सहा लोकांची नावे पुकारायचा आग्रह होतो.

एखादा चाळिशीतला तरूण उठतो. हे वय असे असते कि संबंधिताला आपण आता अल्लड वय सोडून पोक्तपणाकडे झुकलो आहोत असे वाटू लागलेले असते. एक जबाबदार नागरीक असल्याने आपले बोलणे, वागणे हे तसे दिसायला हवे असे वाटून गहन विषयावरची मतं मांडायला सुरूवात झालेली असते. काही जण तिशीतच या स्टेजला पोहोचतात. यांच्याकडे पन्नाशीला आलेले मिस्कीलपणे बघत असतात. खरे तर त्यांना आपली दहा वर्षांपूर्वीची अवस्था आठवत असते. पन्नाशीतल्यांना साठी प्लस वाले न हसता आतल्या आत हसत बघत असतात. सत्तरी ओलांडता ओलांडता बदमाषी थोडी मुरलेली असते. न हसता वेड्याचं सोंग घेत फिरकी घ्यायची कला अंगात चांगलीच जिरलेली असते. हा श्रोता वर्ग गंभीरपणे बसलेला असताना संबंधित चाळीस पंचेचाळीशीतले व्यक्तिमत्व उठते.

'व्यासपीठावरचे सर्व प्रतिष्ठीत नागरीक, जमलेले सर्व मान्यवर, आदरणीय गुरूजी आणि स्वर्गवासी श्री............ यांना नमस्कार करून मी माझे दोन शब्द आपल्या समोर ठेवत आहे.

आज आपण तात्यांच्या निधनानिमित्त जमलेलो आहोत. खरे म्हणजे तात्या हे फक्त आमचे मित्र श्री अमूक यांचेच वडील नसून माझेही वडीलच होते. त्यामुळे ते कधी जातील यावर विश्वासच बसत नाही. खरे तर ऐंशी हे वय आजकालच्या आधुनिक जगात जाण्याचे नाहीच. या वयात लोक आपले छंद पूर्ण करतात.

युरोप देशातल्या इस्टोनिया देशातले रिचर्ड यांचंच घ्या. ते ८० व्या वर्षी चित्र काढायला शिकले. रिचर्ड यांचे चरित्र माझ्याच मुद्रणालयात मुद्रित झाले. मी स्वतः जातीने त्याची पूफे तपासली. आमचेच एक मित्र रिचर्ड यांचे चरित्र लिहीत आहे. तुम्ही म्हणाल कि आडनाव नाही का रिचर्डला ? तर आमच्या धंद्यात सगळेच उघड करता येत नाही. हे रिचर्ड आमच्या मित्राकडेच चित्रकला शिकले. आमचे हे मित्र सुद्धा आज पैंच्याऐंशी वर्षांचे आहेत. ते मला मित्र म्हणा असे म्हणतात म्हणून मी मित्र मानतो. नाहीतर त्यांना काका म्हणायला पाहीजे एव्हढे संस्कार आहेत. आमचे हे मित्र उत्तम लेखक देखील आहेत. त्यांना मीच रिचर्ड यांच्यावर लिहा असा आग्रह केला. त्यांनाही ते पटले आणि आज माझ्या मुद्रणालयात ते काम पूर्णत्वास गेले आहे (टाळ्यांसाठी पॉज, पण प्रसंग ध्यानात येऊन खजील होते पुढे चालू)..

**तात्यांचे सुद्धा वाचन अफाट होते. एव्हढे दांडगे वाचन मी कधीच पाहिले नाही.**

ते माझ्याशी तासन तास चर्चा करायचे. ( तात्यांची मुलं चमकून बघतात. हे आपल्याला कसे ठाऊक नाही ?)

त्यांनी चार पुस्तकांचा संकल्प सोडला होता आणि मी त्यांना ती छापून देण्यासाठी मदत करण्याचे आश्वासन दिले होते. आज त्यांच्या मुलांनाही माहिती नाही, त्यातली तीन पुस्तके छापून पूर्णत्वास गेली आहेत. त्याचे गठ्ठे गाडीत आहेत. सर्वांची परवानगी असेल तर आजच त्याचे अनावरण होणे समयोचित होईल.

तुम्ही म्हणाल कि काय हा व्यवसाय बघतो!

पण तसे नाही. व्यवसाय करत असताना सामाजिक भान म्हणून तात्यांची ही पुस्तके मी छापली. कारण तात्यांनी आज या ठिकाणी जे सामाजिक भान जपले आहे त्याची मला जाणिव आहे. त्यांनी अनेक लोक जोडण्याचे काम या ठिकाणी केलेले आहे. आज त्यांनी कुटुंब तसेच परीसरातले सौहार्दाचे वातावरण वाढवण्याचे काम केलेले आहे. त्याबद्दल त्यांनी कधीही जाहिरात केली नाही. ना स्वतःच्या कुटुंबात त्यांनी चर्चा केली. त्यांना या गोष्टी फक्त माझ्याजवळच बोलाव्याशा वाटत याचा मला अभिमान वाटतो.

तात्यांकडे मी 'महाराष्ट्रातल्या काव्यपरंपरेवरच्या समिक्षेची समीक्षा – एक गंभीर टीका' या ग्रंथावर चर्चा करण्यासाठी येत असे.

तात्यांना समज असलेला श्रोता मिळाल्यावर ते खुलत असत. एरव्ही त्यांच्याकडे असलेली ही विद्वत्ता जवळच्या लोकांना रस नसल्याने अव्यक्त राहिली होती. या चर्चेदरम्यान मी तात्यांना लिबिया या देशातल्या हिशम मातार या पुलित्झर पुरस्काराने गौरवित कवीच्या कवितेचा संदर्भ दिला होता तेव्हां त्यांनी कौतुकाने माझ्या पाठीवर थाप मारली होती.

इतकेच नाही तर भैरप्पांच्या पर्व कादंबरीवरील चर्चेदरम्यान मी ग्रीक कवी होमर च्या इलियडमधला एक उतारा ऐकवला होता. तेव्हांही त्यांनी दोन्ही भिवया उंचावून आश्चर्य व्यक्त करत मला मिठी मारली होती. मला जे तात्या ठाऊक आहेत ते कुणालाच ठाऊक नाहीत. अगदी घरच्यांनाही नाही. कारण त्यांच्या साठी ते एक आधारवड होते. त्याच्या सावलीत घरचे लोक होते. या झाडाच्या सावलीवर, फळांवर, पानांवर त्यांचाच हक्क होता. तो त्यांचा आधार हरपला आहे याचे दु:ख आहेच.

पण माझे त्यांचे नाते याही पलिकडचे होते. कोणतीही अपेक्षा नसलेले आमचे हे नाते होते. त्याची वाच्यता मी कधी माझ्या मित्राकडेही केली नाही. त्यामुळेच तात्यांचे हे रूप फक्त मलाच माहिती आहे या माझ्या म्हणण्यात अजिबात अतिशयोक्ती नाही. त्यांचे जागतिक काव्यावरचे जे पुस्तक अप्रकाशित आहे ते त्यांची मुलं पुढाकार घेऊन पूर्ण करतीलच याची मला पूर्ण खात्री आहे.

त्यांनी नेहमीच तरूणांना पुढे नेण्याचे काम केलेले आहे. कुणाचा व्यवसाय असेल त्याला मदत करण्याचे काम या ठिकाणी केलेले आहे. माझ्या माहितीतल्या अनेक गरीब वस्तीतल्या मुलांच्या शिक्षणाचा खर्च त्यांनी न बोलता उचलण्याचे काम या ठिकाणी केलेले आहे.

तात्यांचे जाणे हे फक्त घरच्यांसाठीच नाही तर माझ्यासारख्या कलासक्त रसिकासाठीही नुकसानच आहे. तसेच या असंख्य गरजूंसाठीही नुकसानच आहे. ते मी शब्दात मांडू शकत नाही.

त्यांचे कार्य त्यांची मुलं चालूच ठेवतील ही आशा व्यक्त करतो आणि माझे दोन शब्द संपवतो.

**राजकीय सभा**

पक्षाच्या सभेत सर्वात मोठ्या सभेचे भाषण संपलेले असते आणि कधी नाही ते सूत्र संचालनाची संधी मिळालेल्या कार्यकर्त्याला आपले महत्व ठसवण्याची खुमखुमी आलेली असते..

आपले सर्वांचे लाडके नेते, पक्षाची मुलूखमैदानी तोफ आदरणीय बाळासाहेब लहाने यांचे भाषण आपण शांतचित्ताने ऐकल्याबद्दल मी सर्वांचे आभार मानतो. साहेबांनी सांगितल्या प्रमाणे आज इथून घरी गेल्यानंतर तुम्ही विचार कराल आणि मगच मतदान कराल ही मला खात्री वाटते. हा कार्यक्रम पार पाडण्यासाठी झटलेल्या सर्व कार्यकर्त्यांचे आभार आणि कौतुक. सभेला परगावाहून आलेल्या श्रोत्यांची वाहने मैदानापासून एक किमी लांब लावलेली आहेत. तिथे बसमधे चढताना ठरल्याप्रमाणे आमचे कार्यकर्ते आपला योग्य तो पाहुणचार करतील. काळजी नसावी. या सभेसाठी दिवसरात्र राबलेल्या माझ्यासारख्या असंख्य कार्यकर्त्यांना साहेब नंतर शाबासकी देणारच आहेत. जे जे कार्यकर्ते माझ्याप्रमाणेचे गेला आठवडा रात्रीचेही झोपलेले नाहीत त्यांची व्यवस्था गांधी पुतळ्याजवळ बाबूराव फरसाणवाल्याकडे केलेली आहे. तरी कुणीही जाऊ नये. साहेबांसाठी मर्चिडीज गाडी पाठवणारे आपले दानशूर शेठजी नवलमल पोकर्णा यांचे उपकार साहेब लक्षात ठेवतीलच. काळजी नसावी.

अशा रितीने आजचा कार्यक्रम निर्विघ्नपणे पार पडला याबद्दल सर्व कल्याणकरांचे आभार मानून मी इथे थांबतो.....

याच क्षणाला जाण्यासाठी निघालेले साहेब आता मर्चिडीजमधे बसू कि नको या विवंचनेत वरीष्ठ कार्यकर्त्याला याला बोलायची संधी कुणी दिली याची विचारणा करत असतात.

**लग्नातले भाषण**

लग्न लागायची वेळ आलेली असते. गुरूजी मंगलाष्टके म्हणायची घाई करत असतात कारण त्यांना पुढच्या कामाला जायचे असते. इतक्यात नेत्यांचे आगमन होते. लग्न थांबते. नवरा नवरीला खुर्चीत बसवले जाते. त्यांच्या हातात दिलेले हार काढून घेतले जातात. नवरी मुलगी नाराजीने काका, मामा कडे बघते. तो हातानेच 'दम धर' असा इशारा करत असतो.

**पुकारा होतो.**

'मंडपात जमलेल्या नागरिकांपैकी प्रतिष्ठीतांचा सत्कार नेत्यांच्या हस्ते करण्यात येणार आहे. त्यांनी नाव पुकारल्यावर वर यायचे आहे. असे म्हणात पन्नास एक नावे घेतली जातात. यात सूत्रसंचालकाला खटल्यातून वाचवलेले वकील, इन्स्पेक्टर साहेब, तलाठी साहेब, शिक्षण अधिकारी, शाळेचे मुख्याध्यापक, सहकारी पतपेढीचे सर्व संचालक, ग्रामपंचायतीचे सर्व सदस्य यांची नावे घेतली जातात. सत्कार संपल्यावर पुन्हा सूत्रधार सांगतो ' सर्व प्रतिष्ठीत नागरिकांचा सत्कार संपलेला आहे. कुणी एखादा राहून गेला असेल तर वाईट वाटून घेऊ नये. कारण आता नेते बोलणार आहेत. त्यांना तातडीने अर्जंट जायचे असल्याने शांततेत सायलेन्स ठेवून सर्वांनी सहकार्य करावे ही नर्म विनंती'

**नेत्यांचे भाषण सुरूहोते.**

'आज या ठिकाणी दादासाहेब इंगळे यांच्या मुलीचा विवाह आहे. त्यांची कन्या ती माझी कन्या. (यावर दबक्या आवाजात खसखस पिकते. अशा अर्थाच्या चर्चा अधून मधून होतच असतात). चि. सारिका हिच्या लग्नासाठी मी आदरणिय पक्षाध्यक्षांशी असलेली मिटींग पुढे ढकलून या ठिकाणी उपस्थित राहिलो आहे. (टाळ्या).

चि. सारिका हिच्या शिक्षणासाठी आपण कधीच मागे पुढे पाहिलेले नाही. कितीबी खर्च होऊ द्या, सारिकाला पाहिजे त्या ठिकाणी प्रवेश मिळेल हे आपण पाहिलेले आहे. तालुक्यातली सगळीच मुलं अशीच शिकावीत हेच ध्येय आपण नेहमी बाळगलेले आहे. परंतु काही लोकांना आमचे हे स्वप्न पूर्ण होऊ द्यायचे नाही. त्यामुळे आमच्या लोकांवर खोटे आरोप होत आहेत. आपल्या साठी झटणाऱ्या लोकांना पोलीस दिवसा ढवळ्या पकडून एन्त आहेत. आम्ही म्हणालो कि, न्यायचे तर न्या, पण रात्रीच्या अंधारात तरी न्या. पण ते तरी काय करणार ? त्यांच्यावर वरून दबावच तसा आहे.

चि. सारिका हिच्याप्रमाणेच आम्हाला तालुक्यातली सगळी मुलं परदेशातल्या केंफर्ड विद्यापीठात शिकायला पाठवायची आहेत. त्यांच्यासाठी काय लागेल तो फंड आपण सरकारी निधीतून मिळावा म्हणून प्रयत्न करत आहोत. पण बाजारसमितीत आमचे पॅनेल बसल्याने सत्ताधाऱ्यांनी ते आमचे स्वप्न हाणून पाडले आहे. त्यांनी शिक्षण महाग करून ठेवले आहे. त्यामुळे नाईलाजास्तव आपल्या भागाच्या विकासासाथी ज्या शिक्षण संस्था आपण उभारल्या आहेत तिथे फी वाढ करावी लागली आहे.

आम्ही शिक्षणाचे कल्याणकारी काम करत असल्याने गरीब बाप दोन एकर, चार एकर विकताना आम्ही डोळ्याने पाहिले आहे. पण काहीही करूशकत नाही. ग्रामपंचायत, पंचायत समितीच्या पाठोपाठ झेडपी पण आमच्या हातातून गेली. नाहीतर आम्ही काही तरी केलंच असतं.

अशा परिस्थितीत मुलांना शिकवावं कसं हाच प्रश्न मतदारंघातल्या नागरिकांपुढं आहे. मुलं तरी का होऊ द्यायची असा प्रश्न लग्न झालेली जोडपी विचारतात आणि ज्यांचे लग्न व्हायचे आहे किंवा ठरलेले नाही ते तर लग्नच नको म्हणत आहेत. ही परिस्थिती का आली याचा विचार आपण आज करायला पाहीजे आहे. आपल्या तालुक्याचा, जिल्ह्याचा विकास कुणाच्या हातात सुरक्षित आहे याचा विचार नीट बारकाने करायला पाहिजे आहे.

आज शिक्षणाचा बट्ट्याबोळ झाला. उद्या फट्याचं पाणी सुटणार नाही. रस्ते खोदले तर नीट होणार नाहीत. परिस्थिती बिकट होत जाणार आहे . याचा विचार करूनच सर्वांनी कारखान्याच्या निवडणुकीत तरी योग्य तो निर्णय घ्यावा. एव्हढे बोलून वधू वरांना पुढील आयुष्यासाठी शुभेच्छा आणि आशिर्वाद देतो आणि माझे दोन शब्द संपवतो.

वधू वर हातात हार आणि चेहऱ्यावर भले मोठे प्रश्नचिन्ह घेऊन अवघडलेल्या अवस्थेत पुढच्या विधीसाठी सज्ज होतात.

## निसर्गरम्य नांगरतास (ता. मंठा) येथे अभाविपचे तीन दिवसीय ग्रामअनुभूती शिबिर उत्साहात संपन्न

दै.चालु वार्ता वृत्तसेवा
मंठा - प्रतिनिधी
सुरेश ज्ञा. दवणे




### विद्यार्थ्यांना ग्रामीण जीवन व संस्कृतीचा घेतला अनुभव; विविध सत्रांमधून प्रबोधन

**जालना (मंठा) :** अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेच्या (अभाविप) जालना जिल्हा शाखेतर्फे आयोजित तीन दिवसीय ग्रामअनुभूती शिबिर नांगरतास (ता. मंठा) या निसर्गरम्य व पौराणिक स्थळी २३ ते २५ मे दरम्यान उत्साहात पार पडले. या शिबिराचे आयोजन नुकत्याच पार पडलेल्या दहावी व बारावी परीक्षांच्या निकालानंतर विद्यार्थ्यांना अभ्यासाच्या तणावातून विरंगुळा मिळावा व त्यांना ग्रामीण संस्कृतीची प्रत्यक्ष ओळख व्हावी या हेतूने करण्यात आले होते. या शिबिरात जिल्हाभरातून आलेल्या एकूण ४६ विद्यार्थी-विद्यार्थिनींनी सहभाग नोंदवला. शिबिराचे उद्घाटन २३ मे रोजी अभाविपचे जिल्हा प्रमुख प्रा. नाना गोडबोले यांच्या हस्ते झाले. यावेळी जिल्हा संयोजक नवनाथ गव्हाणे यांनी शिबिर आयोजनामागील उद्देश व अभाविपच्या कार्याची माहिती दिली.

**गिरीभ्रमण, सांस्कृतिक खेळ आणि विचार प्रेरक सत्रे**

या तीन दिवसांत विद्यार्थ्यांनी डोंगरावर चढून निसर्गसंपन्न परिसराचा अनुभव घेतला. पारंपरिक खेळांमध्ये 'मामाचे पत्र हरवले', 'हु तू तू', 'कबड्डी' आदींचा समावेश होता. यामुळे विद्यार्थ्यांमध्ये सहकार्याची भावना व शारीरिक तंदुरुस्तीला चालना मिळाली.

प्रा. नाना गोडबोले यांनी शिबिरार्थींना अहिल्यादेवी होळकर यांच्या त्रिशताब्दी जयंती वर्षानिमित्त त्यांच्या जीवन कार्याची माहिती दिली. तसेच शिबिरामध्ये विविध विषयांवरील मार्गदर्शनपर सत्रेही आयोजित करण्यात आली होती.

प्रसिद्ध सामाजिक कार्यकर्ते श्री तुलजेशजी चौधरी यांनी भगवद्गीता या विषयावर प्रेरणादायी विचार मांडले, तर प्रा. डॉ. रामेश्वर पाटील (बदनापूर) यांनी आंतरराष्ट्रीय संबंध आणि भारत-पाकिस्तान युद्ध यावर सविस्तर विवेचन केले.

**कवितेतून प्रबोधन व करिअर मार्गदर्शन सत्र**

संध्याकाळच्या मनोरंजन सत्रात डॉ. कन्नुलाल विटोरे (प्रा., मॉडेल कॉलेज, घनसावंगी) यांच्या अध्यक्षतेखाली कवितेतून प्रबोधन कार्यक्रम आयोजित करण्यात आला. यामध्ये प्रसिद्ध भारूडकार दत्ता महाराज टरले, डॉ. मोहन घोडसे यांच्यासह विद्यार्थ्यांनीही कवितांचे सादरीकरण करून सत्रात रंगत आणली. श्रीनिवास हजारे (संचालक, प्रयाग सायन्स अकॅडमी, जालना) यांनी करिअर मार्गदर्शन या विषयावर विद्यार्थ्यांचे योग्य दिशेने मार्गदर्शन केले.

समारोप सत्रात आनंदगिरी महाराजांचे मार्गदर्शन

शिबिराच्या समारोपप्रसंगी नांगरतास तीर्थक्षेत्राचे महंत आदरणीय आनंदगिरी महाराज प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. त्यांनी विद्यार्थ्यांना शुभेच्छा देत जीवनात साधेपणा, आत्मिक मूल्ये व समाजासाठी कार्य करण्याची प्रेरणा दिली. या वेळी व्यासपीठावर अभाविप देवगिरी प्रांताचे सहमंत्री स्वप्निल बगाडे, जिल्हा प्रमुख प्रा. नाना गोडबोले, जिल्हा संयोजक नवनाथ गव्हाणे, शिबिरप्रमुख लहू किंगरे यांची उपस्थिती होती. समारोप सत्राचे सूत्रसंचालन साक्षी गोडसे यांनी तर आभार प्रदर्शन लहू इंगळे यांनी केले.

विद्यार्थ्यांनी या शिबिरातून केवळ निसर्गसौंदर्याचा अनुभव घेतला नाही, तर मूल्याधिष्ठित विचार, सांस्कृतिक जाणीवा आणि भविष्याचे योग्य दिशेने मार्गदर्शन या गोष्टींचाही लाभ घेतला.

## युवा जागर शिबिरात संविधान, प्रसार माध्यमे आणि आदिवासी प्रश्नांवर सखोल चर्चा

दै.चालु वार्ता वृत्तसेवा
डहाणू - प्रतिनिधी
सुधीर घाटाळ



### कोसबाड येथे 'आरोहन' संस्थेच्या उपक्रमास युवकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

**डहाणू :** 'आरोहन' संस्थेच्या वतीने डहाणू तालुक्यातील कोसबाड येथे २३ व २४ मे २०२५ रोजी दोन दिवसीय 'युवा जागर शिबिर' आयोजित करण्यात आले. या शिबिरात पालघर जिल्ह्यातील विविध भागांतून आलेले ३१ युवक-युवतींनी सहभाग घेतला. शिबिराची सुरुवात 'एकमेकांना जाणून घेऊया' या सत्राने झाली. विशेष म्हणजे या सत्रात पारंपरिक पद्धतीऐवजी ओळखीचा नवा मार्ग वापरण्यात आला. सहभागी युवकांनी एकमेकांची ओळख करून घेत स्वतःची स्वतः ओळख न सांगता निवडलेल्या सहकारीची ओळख करून दिली. या वेळी 'जागीर सारा रारा...' हे प्रबोधनात्मक गाणं सगळ्यांनी उभं राहून गायले.

'संविधानाशी संवाद : जागरूक नागरित्वासाठी' या सत्रात राही श्रुती गणेश यांनी 'इन छोटी बातोंसे लडकर क्यू खोते हैं हम खुशिया' या गाण्याच्या माध्यमातून संविधानातील मूलभूत अधिकार आणि कर्तव्यांची माहिती दिली. सहभागी युवकांना चार गटात विभागून 'स्वातंत्र्याचा अधिकार', 'शोषणाविरुद्धचा अधिकार', 'धर्म स्वातंत्र्याचा अधिकार', 'समतेचा अधिकार' अशा विषयांवर चर्चा करून सविस्तर कलमे समजावण्यात आली.

पालघर जिल्ह्याचा राजकीय, सामाजिक व आर्थिक इतिहास ज्योती केळकर यांनी नकाशाच्या मदतीने तालुका निहाय सोप्या भाषेत मांडला. शिक्षण सत्रात शिक्षणाच्या वाटेवरील अडचणी, इंटरनेट युगात आदिवासी व ग्रामीण विद्यार्थ्यांची परिस्थिती, वह्यापुस्तकांपलीकडील शिक्षणाचे महत्त्व वर्षा फातर्फेकर यांनी अधोरेखित केले. शिबिरात 'चार्ली चॅप्लिन' चा 'मॉडर्न टाईम' हा मूकपट दाखवून माहितीपटाचे सत्रही घेण्यात आले. त्यानंतर प्राची हातीवलेकर यांनी महिलांच्या सामाजिक, आर्थिक व राजकीय विकासावर सविस्तर मार्गदर्शन केले. ब्रायन लोबो यांनी आदिवासी समूहाचे प्रश्न आणि वनहक्क कायद्यावरील उपाययोजना मांडल्या. रमाकांत पाटील यांनी माध्यमांची जबाबदारी, वर्तमानपत्र, टीव्ही, डिजिटल मीडिया यांचे भूतकाळ व वर्तमानावर चर्चा घडवून आणली. समारोपाच्या सत्रात 'विकास म्हणजे काय रे भाऊ?' या विषयावर आरोहंनचे मुख्य कार्यकारी अधिकारी अमित नारकर यांनी थोडक्यात पण प्रभावी भाष्य करत शिबिराचा समारोप केला. शिबिरामुळे सहभागी युवकांमध्ये संविधाना विषयी जागरूकता, समाज माध्यमांवरील समज, शिक्षणाचे महत्त्व आणि आदिवासी समाजाच्या प्रश्नांची जाण निर्माण झाली. 'युवा जागर शिबिर' हे केवळ प्रशिक्षण नव्हे, तर सामाजिक जाणिवांचा उजाळा ठरले.

या शिबिराच्या यशस्वी आयोजनासाठी आरोहन संस्थेचे सुजाता आयरकर, कौस्तुभ घरत, सूर्यकांत गावित, श्नेहा गमरे यांच्यासह इतर कार्यकर्त्यांनी मोलाची भूमिका बजावली. पुढील काळात असेच सत्र आयोजित करून युवकांचे नेटवर्किंग आणि सामाजिक कामाची दिशा ठरवण्याचा संकल्प यावेळी करण्यात आला.

## सैनिकांच्या शौर्याला सलाम करण्यासाठी रिपाईच्या भारत जिंदाबाद रॅलीत कार्यकत्यांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे -दीपक कांबळे

दै.चालु वार्ता वृत्तसेवा
केज- प्रतिनिधी

**केज :** देशाच्या सैनिकांनी युद्धखोर पाकिस्तानची खुमखुमी जिरविली. त्यांच्या शौर्याला सलाम करण्यासाठी रिपाइंचे वतिने आयोजित केलेल्या भारत जिंदाबाद रॅलीत मोठ्या संख्येने सहभागी होण्याचे आव्हान केज तालुकाध्यक्ष दिपक कांबळे यांनी केले आहे.

भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार भारतरत्न डॉ. बाबासाहेबांनी म्हटले होते की, मी प्रथम भारतीय आणि अंतिमही भारतीयच आहे.



यामुळे देशाचे सार्वभौमत्व महत्वाचे आहे. भारतीय सैनिकांनी पाकव्याप्त काश्मीर आणि पाकिस्तानातील अतिरेकी तळ उध्वस्त केले. देशासाठी लढलेल्या सैनिकांचे मनोबल उचलण्यासाठी आणि त्यांच्या शौर्याला सलाम करण्यासाठी रिपाइंचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा केंद्रीय सामाजिक न्याय मंत्री रामदास आठवले यांच्या आदेशावरून युवा रिपाइंचे प्रदेशाध्यक्ष पप्पू कागदे यांनी बीड येथे दि. ३० मे रोजी भारत जिंदाबाद रॅली आयोजित केली आहे. ही रॅली डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळ्या पासून छत्रपती शिवाजी महाराज पुतळ्या पर्यंत आयोजित केली आहे. भारत जिंदाबाद रॅलीत केज तालुक्यातील रिपाइंच्या कार्यकर्त्यांनी मोठ्या संख्येने सहभागी होण्याचे आवाहन तालुका अध्यक्ष दिपक कांबळे यांनी केले आहे. भारत जिंदाबाद रॅलीत तालुक्यातील जास्तीत जास्त कार्यकर्ते सहभागी होण्यासाठी दिपक कांबळे, जिल्हा संघटक रविंद्र जोगदंड, सरचिटणीस गौतम बचुटे, ज्येष्ठ नेते दिलीप बनसोडे, तालुका उपाध्यक्ष रमेश निशिगंध, आयटी सेलचे सुरज काळे, मिलिंद भालेराव, कैलास जावळे, प्रशांत हजारे, विनोद शिंदे, हर्षद्र तुपारे, दादाराव धेंडे, धिरे हे परिश्रम घेत आहेत.

## शिक्षक अभियोग्यता व बुध्दीमत्ता चाचणी (TAIT) २०२५ परीक्षेचे प्रवेशपत्र उपलब्ध

दै.चालु वार्ता वृत्तसेवा
कोल्हापूर - प्रतिनिधी
पंडित चौगुले

**कोल्हापूर :** राज्यातील सर्व स्थानिक स्वराज्य संस्था व खाजगी व्यवस्थानाच्या शाळांमध्ये पवित्र या संगणकीय प्रणालीव्दारे शिक्षक भरती करीता शिक्षक अभियोग्यता व बुध्दीमत्ता चाचणी (TAIT) २०२५ या परीक्षेचे ऑनलाईन पध्दतीने नियोजन दिनांक २७ मे ते दिनांक ३० मे २०२५ व दिनांक २ जून ते दिनांक ५ जून २०२५ या कालावधीत करण्यात आलेले आहे. त्यासाठी ऑनलाईन आवेदनपत्र सादर केलेल्या उमेदवारांना प्रवेशपत्राची वेबलिंक महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेच्या www.mscepune.in या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आल्याची माहिती पुणे महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेचे आयुक्त अनुराधा ओक यांनी प्रसिध्दी पत्रकाव्दारे कळविले आहे.

# १० मे च्या मध्यरात्री भारताने अशी एक गोष्ट केली की

## त्यामुळेच पाकिस्तानला याव लागलं शरण !

दै.चालु वार्ता वृत्तसेवा



**मुंबई :** ऑपरेशन सिंदूर संदर्भात आलेल्या एका नव्या रिपोर्टने जगभरात खळबळ उडवून दिली आहे. तीन दिवस पाकिस्तानने युद्धाची खुमखुमी दाखवली. पण १० मे च्या मध्यरात्री इंडियन एअर फोर्सने पाकिस्तानात अक्षरक्ष: तांडव केलं. त्यात पाकिस्तानच किती नुकसान झालं, त्याची माहिती समोर आलीय. भारताची मजबूत एअर डिफेन्स सिस्टिम आणि भारतीय मिसाईल्सचा अचूक प्रहार यामुळे पाकिस्तान लगेच गुडघ्यावर आला. चीनची एअर डिफेन्स सिस्टिम भारतीय हल्ल्यांपासून पाकिस्तानच रक्षण करण्यात पूर्णपणे अपयशी ठरली. भारताच्या ब्रह्मोस मिसाइलच्या मारक क्षमतेने पाकिस्तान अजूनही घाबरलेला आहे. १० मे च्या मध्यरात्री भारताने असं काय केलं, ज्यामुळे पाकिस्तानला अमेरिकेसमोर अक्षरक्ष: याचना करावी लागली. इंडियन एअर फोर्सच्या फायटर जेट्सनी १० मे च्या मध्यरात्री पाकिस्तानवर चार ठिकाणी मिसाइल हल्ले केले. राफेलमधून स्काल्प आणि सुखोई SU-30 MKI मधून ब्राह्मोस मिसाईल्स डागण्यात आले. चकालाच्या नूर खान एअरबेसवर ब्राह्मोसद्वारे पहिला हल्ला करण्यात आला. त्यात पाकिस्तानचं उत्तरेकडचं एअर कमांड आणि कंट्रोल नेटवर्कच उद्धवस्त झालं. शेवटचा हल्ला जकोबाबाद आणि भोलारी एअर बेसवर करण्यात आला. तो पर्यंत पाकिस्तान गुडघ्यावर येऊन सीजफायरसाठी अमेरिकेसाठी भीख मागत होता.

**मध्यरात्री पाकिस्तानचे जे मेसेज इंटरसेप्ट केले त्यात काय होतं?**

ऑपरेशन सिंदूरला प्रत्युत्तर म्हणून पाकिस्तानने १० मे च्या मध्यरात्री १ वाजता ऑपरेशन 'बुनयान अल-मरसूस' लॉन्च केलं. पुढच्या ४८ तासात भारतीय एअरबेसेस उद्धवस्त करण्याच त्यांनी लक्ष्य ठेवलं होतं. पाकिस्तानातील जे कम्युनिकेशन इंटरसेप्ट केले, त्यातून ही माहिती समोर आली. हिंदुस्थान टाइम्सने सूत्रांच्या हवाल्याने हे वृत्त दिलं आहे. पण IAF असा हवाई हल्ला चढवला की, पाकिस्तानला अवघ्या काही तासात 'बुनयान अल-मरसूस' ऑपरेशन गुंडाळाव लागलं.

**S-400 एअर डिफेन्स सिस्टिम कितीवेळा वापरली?**

ऑपरेशन सिंदूरमध्ये भारताने आदमपूर बेसवरील S-400 एअर डिफेन्स सिस्टिम ११ वेळा वापरली. पाकिस्तानच SAAB-2000 एअरबॉर्न अर्ली वॉर्निंग सिस्टिमच विमान ३१५ किलोमीटर आतमध्ये होतं. तिथपर्यंत खोलवर प्रहार करुन हे विमान पाडलं. SAAB-2000 हे रडार प्लेन आहे. या विमानाद्वारे कुठून कसा हवाई हल्ला होणार त्याची माहिती मिळते. इंडियन एअर फोर्सने हे विमान पाडून पाकिस्तानला आंधळ करुन सोडलं.

**पाकिस्तानची कुठली विमान पाडली त्याची माहिती**

भारतीय मिसाईल्सनी पाकिस्तानच C-130 J, JF-17 आणि दोन F-16 विमानं पाडल्याचे पुरावे इंडियन एअर फोर्सकडे आहेत. टार्गेट चुकू नये म्हणून IAF ने स्काल्प आणि ब्राह्मोस ही दोन्ही मिसाइल्स वापरली. पाकिस्तान एअर फोर्सच इतकं नुकसान झाल्यानंतर आपण लढू शकत नाही, हे पाकिस्तानला कळून चुकलं. भारताकडून अजून मार पडू नये म्हणून त्यांनी शरणागती पत्करुन अमेरिकेसमोर सीजफायरची याचना केली. इंडियन एअर फोर्सने या ऑपरेशनद्वारे संपूर्ण जगाला आपली ताकद आणि कौशल्य दाखवून दिलं.

# शरद सोनवणे पुन्हा विधानसभेत दिसता कामा नये

## खासदार संजय राऊत यांची टीका !

दै.चालु वार्ता वृत्तसेवा



**मुंबई :** अजित पवारला काय सोनं लागलं आहे का? शरद सोनवणे यांच्या आडनावातच सोनं आहे; मात्र तो 'बदला' माणूस आहे. शिवसेनेची चाळीस हजार मते त्याला पडली, म्हणून तो आमदार झाला. तो जर अपक्ष राहिला असता, तर माफ केले असते. तो एकनाथ शिंदे यांच्या पक्षात गेल्याने त्याला आता माफ करूनका अशी टीका संजय राऊत यांनी केली.

शरद सोनवणे पुन्हा विधानसभेत दिसता कामा नये. आगामी विधानसभा निवडणुकीत शिवसेनेचा आमदार आपल्याला करावाच लागेल. यापुढे कोणतीही सेटलमेंट होणार नाही. आगामी जिल्हा परिषद, नगरपालिका विधानसभा निवडणुकीच्या तयारीला लागा, असा आदेश शिवसेनेचे प्रवक्ते, खासदार संजय राऊत यांनी पक्षकार्यकर्ते व पदाधिकाऱ्यांना दिला.

नारायणगाव येथील उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या पदाधिकाऱ्यांच्या आयोजित मेळाव्यात खासदार राऊत बोलत होते. खासदार संजय राऊत म्हणाले की, अजित पवार एकनाथ शिंदे हे त्यांच्या पक्षाचे नेते नाहीत. अमित शहा त्यांच्या पक्षाचे प्रमुख आहेत.

शिवसेना पक्ष संघर्षातून उभा राहिला आहे. आपण विरोधी पक्षात आहोत, याचे कार्यकर्त्यांनी भान ठेवून सर्वसामान्यांचे प्रश्न सोडविण्यासाठी रस्त्यावर यावे. विधानसभेची उमेदवारी शरद पवार यांच्याकडे आम्ही मागितली होती. मात्र, महाविकास आघाडीचा धर्म टिकविण्यासाठी ही उमेदवारी राष्ट्रवादी काँग्रेसला दिली.

महाविकास आघाडीच्या उमेदवाराला मिळालेल्या ६४ हजार मतांपैकी शिवसेनेची चाळीस हजार मते आहेत. सोनवणे यांना मिळालेल्या मतांपैकी ४० हजार मते शिवसेनेची आहेत. तालुक्यात ८० हजार शिवसेनेची मते असून, जुन्नर हा शिवसेनेचा बालेकिल्ला आहे. २०२९ च्या निवडणुकीत जुन्नरची जागा शिवसेना लढविणार आहे.

जुन्नरवर भगवा फडकविणार, हे निश्चित आहे. आ. सचिन अहिर म्हणाले की, आगामी जिल्हा परिषद, नगरपालिका निवडणुकीच्या तयारीला लागा. शिवसेनेची ताकद दाखवून द्या. काही लोकांनी स्वार्थासाठी दुसरा झेंडा खांद्यावर घेतला आहे. शेतकऱ्यांचे, सर्वसामान्यांचे प्रश्न सोडविण्यासाठी संघर्ष करा. या वेळी बबनराव थोरात यांनी मनोगत व्यक्त केले.

# देवेंद्रजी अन त्यांच्या टीमने एक नवा आदर्श घालून दिलाय !

## नागपुरातील कार्यक्रमात अमित शाहांकडून CM फडणवीसांचे तोंड भरून कौतुक; म्हणाले...

दै.चालु वार्ता वृत्तसेवा



**मुंबई :** सार्वजनिक कार्यक्रमात आज सर्वांसमोर बोलू इच्छितो की, येणाऱ्या काळात भारतातील सर्वोत्तम कॅन्सर इन्स्टिट्यूटमध्ये नागपुरातील नॅशनल कॅन्सर इन्स्टिट्यूट राहणार आहे. कारण या कॅन्सर इन्स्टिट्यूटच्या पाठीमागे कर्मठ लोक उभे आहेत आणि त्यांचात सेवेचा भाव आहे. देवेंद्र फडणवीस आणि त्यांचे मित्र शैलेश जोगळेकर दोघांबद्दल ही बोलू इच्छितो, दोघांच्या कुटुंबात कॅन्सरमुळे दुःख आले होते, कुटुंबाचे नुकसान झाले होते. मात्र दोघांनी त्यांच्या व्यक्तिगत दुःख आणि वेदनेला सार्वजनिक सेवेमध्ये परावर्तित केलं आणि गरजू लोकांच्या सेवेसाठी रूपांतरित केलं. असे म्हणत केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांचे कौतुक केलं आहे.

केंद्रीय गृह मंत्री अमित शहा आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत नागपुरात 'नॅशनल कॅन्सर इन्स्टिट्यूट' मध्ये 'स्वस्ति निवास पंथागार' या कॅन्सर पीडित रुग्ण आणि त्यांच्या नातेवाईकांसाठीच्या निवासगृहाचा भूमिपूजन सोहळा पार पडत आहे. नॅशनल कॅन्सर इन्स्टिट्यूट मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा ड्रीम प्रोजेक्ट असून फडणवीसांनी त्यांच्या वडिलांच्या कॅन्सर आजाराने मृत्यूनंतर नागपूरसह मध्य भारतातील कॅन्सर रुग्णांसाठी एक चॅरिटेबल हॉस्पिटल सुरू करण्याचा स्वप्न पाहिलं होतं. २०१२ पासून टप्प्याटप्प्याने कॅन्सर रुग्णालयाचं स्वप्न पूर्ण होत गेलं आणि एप्रिल २०२३ पासून नॅशनल कॅन्सर इन्स्टिट्यूट नागपुरात पूर्ण क्षमतेने कार्यरत झालंय. या कार्यक्रमात बोलताना अमित शाह यांनी मुख्यमंत्र्यांचे कौतुक केलं आहे.

**देवेंद्र फडणवीस आणि त्यांचे टीमने एक नवा आदर्श समोर ठेवलाय- अमित शाह**

पुढे बोलताना अमित शाह म्हणाले की, देवेंद्र फडणवीस महाराष्ट्राचे मुख्यमंत्री दुसऱ्यांदा बनले आहे, मात्र जेव्हा फडणवीस यांनी कॅन्सर इन्स्टिट्यूटचं काम सुरू केलं, तेव्हा ते काहीच नव्हते. तरी त्यांनी सुरुवात केली. अशा सेवा कार्यांना देवाचा आणि समाजाचा आशीर्वाद मिळतो आणि म्हणूनच नॅशनल कॅन्सर इन्स्टिट्यूटचा वटवृक्ष इथे उभा आहे आणि हजारो गरजूंच्या जीवनातून दुःख दूर करत आहे. पश्चिमी देशात जेव्हा रुग्ण आजारी पडतात, तेव्हा त्याला रुग्णालयाच्या भरवशावर सोडून दिलं जातं. मात्र आपल्याकडे जेव्हा कुटुंबातील एक व्यक्ती आजारी पडतो, तेव्हा संपूर्ण कुटुंब त्याच्या सेवेमध्ये योगदान देत असतं. या स्वस्ति निवासच्या माध्यमातून भारतातील सर्व रुग्णालयांसाठी एक नवा आदर्श देवेंद्र फडणवीस आणि त्यांचे टीमने समोर ठेवला आहे. या स्वस्तिनिवासच्या माध्यमातून रुग्णांच्या नातेवाईकांची संवेदना कायम ठेवण्याचा काम करेल. असा विश्वासही अमित शाह यांनी यावेळी बोलताना व्यक्त केला आहे.

# पंतप्रधान मोदींच्या 'त्या' कृतीने सोफिया कुरेशींच्या कुटुंबाला झाला आनंद !

## जुळी बहीण शायनाने सांगितला रोड शोमधील प्रसंग...

दै.चालु वार्ता वृत्तसेवा



**मुंबई :** भारतीय सैन्यदलातील कर्नल सोफिया कुरेशी हे नाव आता संपूर्ण भारताला परिचित झाले आहे. आता त्यांचे कुटुंबियही चर्चेत आहेत. पंतप्रधान मोदी दोन दिवसांच्या गुजरात दौऱ्यावर असून आज वडोदरा येथे त्यांचा रोड शो संपन्न झाला. यावेळी कर्नल सोफिया कुरेशी यांच्या कुटुंबाने त्यांच्यावर फुलांचा वर्षाव केला. यानंतर पंतप्रधान मोदींनीही कुरेशी कुटुंबियांकडे पाहून केलेली कृती चर्चेत आहे. सोफिया कुरेशी यांची जुळी बहीण शनाया सुनसाराने याबद्दल माहिती दिली.

सोफिया कुरेशी यांचे वडील ताज मोहम्मद, आई हलिमा कुरेशी यांनी पंतप्रधान मोदींच्या रोड शो दरम्यान हजेरी लावली. ऑपरेशन सिंदूरला मिळालेल्या यशानंतर पंतप्रधानांना शुभेच्छा देण्यासाठी या रोड शोचे आयोजन करण्यात आले होते. रोड शोनंतर कर्नल सोफिया कुरेशी यांनी एएनआयशी बोलताना सांगितले, 'पंतप्रधान मोदींना भेटून आम्हाला आनंद झाला. त्यांनी महिला सशक्तीकरणासाठी खूप काम केले आहे. मी स्वतः एक महिला आहे आणि मला याचा आनंद वाटतो की, पंतप्रधानांनी महिलांना पुढे आणण्यासाठी खूप प्रयत्न केले. सोफिया माझी जुळी बहीण आहे. ती माझ्यापेक्षा १५ मिनिटांनी मोठी आहे. तिने देशासाठी खूप चांगले काम केले असून ती अनेकांसाठी आता प्रेरणा बनली असून ती माझीच नाही तर देशाची बहीण झाली आहे.

**पंतप्रधान मोदींची 'ती' कृती चर्चेत**

शायना सुनसारा यांनी पुढे म्हटले की, पंतप्रधान मोदी जेव्हा आमच्या समोरून जात होते, तेव्हा त्यांनी माझ्या वडिलांकडे पाहून नमस्कार केला. आम्हीही त्यांना नमस्कार करून प्रतिसाद दिला. आमच्यासाठी हा खूप आनंदाचा क्षण होता. या प्रसंगाचे वर्णन शब्दांत करणे अवघड आहे. आम्हाला असे वाटले की, पंतप्रधान मोदी संदेश देत आहेत की, ते आमच्या पाठी उभे आहेत.

शायना सुनसारा पुढे म्हणाल्या की, आपले पंतप्रधान नेहमी पुढे येऊन देशातील जनतेला आधार देत असतात. ही अभिमानास्पद बाब आहे. आजच्या रोड शोमध्ये महिलांची उपस्थिती मोठ्या संख्येने होती. पंतप्रधान मोदींच्या नेतृत्वात एवढ्या मोठ्या मोहिमेला यशस्वी करण्यात आले. ऑपरेशन सिंदूरच्या पत्रकार परिषदेत माझी बहीण कर्नल सोफिया कुरेशी आणि विंग कमांडर व्योमिका सिंग लष्करी कारवाईची माहिती देत होत्या. यातून जगाला संदेश दिला गेला की, महिला कुणापेक्षाही कमी नाहीत.

पंतप्रधान मोदी दोन दिवसांच्या गुजरात दौऱ्यावर असून ते दाहोद, भूज, गांधीनगर येथे हजारो कोटी रुपयांच्या विविध विकास प्रकल्पांचे भूमिपूजन आणि उद्घाटन करणार आहेत.

# धुळ्यातील पैसे प्रकरणात अर्जुन खोतकर दोषी; अंजली दमानियांचे गंभीर आरोप !

दै.चालु वार्ता वृत्तसेवा



**धुळे :** महाराष्ट्र राज्य विधिमंडळ अंदाज समितीच्या तीन दिवसीय धुळे नंदुरबार दौऱ्यात सापडलेल्या रकमेने राज्याच्या राजकीय वर्तुळात एकच खळबळ उडाली होती. अंदाज समितीचे अध्यक्ष असलेले अर्जुन खोतकर यांचे शासकीय स्वीय सहाय्यक किशोर पाटील यांच्या धुळे शहरातील विश्रामगृह रूम नंबर १०२ मध्ये १ कोटी ८४ लाख ८४ हजार रुपये मिळून आले आणि यानंतर ही अंदाज समिती चांगली चर्चेत आली. यावरुनच आता सामाजिक कार्यकर्त्या अंजली दमानियांनी गंभीर आरोप केले आहेत. धुळ्यात सापडलेल्या पैसे प्रकरणाची कसून चौकशी झाली पाहिजे. अशी मागणी सामाजिक कार्यकर्त्या अंजली दमानिया यांनी केली आहे. दमानिया आज जालना दौऱ्यावर आहेत. या दौऱ्यादरम्यान त्यांनी ही मागणी केली आहे. धुळ्यात १कोटी ८४ लाख खोतकरांच्या स्विय्य सहाय्यकांच्या खोलीत सापडले पण त्याआधी ते साडेतीन कोटी घेऊन पळाले असल्याचा आरोप देखील दमानिया यांनी केला आहे. धुळ्यातील प्रकरणात खोतकर दोषी असल्याचं सरकारलाही माहीत आहे असा टोलाही दमानिया यांनी हाणला आहे. दोषी नव्हते तर मग खोतकरांच्या सहाय्यकाला निष्कसीत कसं काय केलं.? असा सवाल देखील त्यांनी उपस्थित केला. मी सगळ्यांविरोधात लढणार आहे अस सांगत जालन्यातील ४१७ नंबरच्या सर्व्हे मध्ये खोतकरांच्या जवळच्या लोकांनी अतिक्रमण केलं असून याबाबत जिल्हाधिकाऱ्यांना हे अतिक्रमण काढण्यासाठी पत्र दिलं असून अतिक्रमण तातडीने काढण्याची मागणी अंजली दमानिया यांनी जिल्हाधिकाऱ्यांकडे केली आहे.

# राशि भविष्य

**मेष :** तुमचा दुर्दम्य आत्मविश्वास आणि कामाची सुटसुटीत वेळ यामुळे आज दिवसभरात विश्रांती घेण्यास वेळ मिळेल. आजच्या दिवशी तुम्हाला आपल्या त्या मित्रांपासून सावध राहायचे आहे जे तुमच्याकडून उधार मागतात आणि नंतर परत करत नाही.

**वृषभ :** आज शांत राहा-तणावमुक्त राहाल. घरात काही कार्यक्रम असण्याने आज तुम्हाला खूप धन खर्च करावे लागू शकते ज्यामुळे तुमची आर्थिक स्थिती खराब होऊ शकते.

**मिथुन :** असुरक्षितता अथवा आत्मविस्मृतीच्या भावनेमुळे चक्कर येईल. घराच्या दृष्टीने केलेली गुंतवणूक फायदेशीर ठरेल. आजच्या दिवसाचे खूप काळजीपूर्वक नियोजन करा.

**कर्क :** तुमचा आजार तुमच्या दु:खाचे कारण ठरेल. लवकरात लवकर त्यावर मात करून कुटुंबात आनंद परत आणा. जे लोक विवाहित आहे त्यांना आज आपल्या मुलांच्या शिक्षणावर चांगले धन खर्च करावे लागू शकते.

**सिंह :** मित्र तुमच्या खुल्या मनाची आणि सहनशक्तीची परीक्षा पाहतील. पण तत्त्वांना शरण न जाता, विवेकी निर्णय घेण्याची खबरदारी घ्या. आज तुम्ही त्या लोकांना उधार देऊ नका ज्यांनी तुमची मागील उधारी चुकवलेली नाही.

**कन्या :** इतरांशी आनंदाचे क्षण वाटल्यामुळे तुमची प्रकृती ताजीतवानी होईल. परंतु, तुम्ही प्रकृतीकडे दुर्लक्ष केलेत तर मात्र तुम्ही परत आजारी पडाल.

**तुळ :** आरोग्य एकदम चोख असेल. आज तुम्हाला चांगल्यापैकी पैसा मिळणार आहे - परंतु खर्चात वाढ झाल्याने बचत करणे दुरापास्त ठरेल. कुटुंबातील सदस्य आपल्या अपेक्षा पु-या करू शकणार नाहीत.

**वृश्चिक :** उच्च कॅलरी असणारा आहार टाळा, आपल्या व्यायामाबद्दल आपुलकी, प्रामाणिकपणा असू द्या. आज कुणी जवळच्या व्यक्ती सोबत तुमचे भांडण होऊ शकते आणि ही गोष्ट कोर्टापर्यत जाऊ शकते.

**धनु :** शाररीक वेदना आणि ताणतणावाचे प्रश्न सुटण्याची शक्यता नाही. अनपेक्षित बिलांमुळे आर्थिक बोजा वाढेल. घराच्या सुशोभीकरणाऐवजी मुलांच्या गरजांकडेदेखील लक्ष देणे महत्त्वाचे आहे.

**मकर :** तुमच्यातील मूल जागे होईल आणि तुम्ही एकदम खेळीमेळीच्या मूडमध्ये जाल. दीर्घकालीन फायद्यासाठी शेअर बाजार आणि म्युच्युअल फंडातील गुंतवणूक फायदेशीर ठरेल.

**कुंभ :** रक्तदाबाचा विकार असणा-यांनी खचाखच भरलेल्या बसमधून प्रवास करताना अधिक काळजी घेणे गरजेचे आहे. कुणी जवळच्या नातेवाइकाच्या मदतीने आज तुम्ही आपल्या व्यवसायात उत्तम प्रगती करू शकतात .

**मीन :** आजच्या दिवशी तुम्ही चैतन्याने भारले असलात तरी तुमच्याबरोबर असायला हवी अशा व्यक्तीची कमतरता तुम्हाला नक्कीच जाणवेल.







## वाचकांना विनम्र सूचना

दै.चालु वार्ता वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींतील मजुकराची शहानिशा करुनच वाचकांनी त्यासंबंधी आर्थिक व्यवहार करावा. जाहिरातीत आपल्या उत्पादनाच्या संदर्भात वा सेवेच्या संदर्भात जाहिरातदार जे दावे करतात, त्याची दै.चालु वार्ता वृत्तपत्र समूह कोणतीही हमी घेत नाही. जाहिरातीत करण्यात आलेल्या दाव्यांची पूर्तता जाहिरातदारांकडून न झाल्यास त्याच्या परिणामाबद्दल दै.चालु वार्ता वृत्तपत्र समूहाचे मुद्रक, प्रकाशक, संपादक व मालक हे जबाबदार राहणार नाहीत. याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.


## जाहिर सूचना

दिनांक : २७/०५/२०२५

नमस्कार,

दै चालु वार्ता कडून जाहीर करण्यात येथे की जर आमचा म्हणजेचं दै चालु वार्ताचा प्रतिनिधी आहे म्हणून कोणी दावा करत असेल तर त्याचं ID कार्ड पाहू शकता किंवा नियुक्ती लेटर सध्या जे आमचे पत्रकार आहेत त्याच्याकडे चालू कालावधीचे ID कार्ड किंवा नियुक्ती लेटर असतं तेंच आमचे पत्रकार आहेत. (कालावधी संपलेले ID किंवा नियुक्ती लेटर असेल आणि ते दै चालु वार्ताचा प्रतिनिधी असल्याचा दावा करत असतील तर ते खोटं आहे. तर आपण आमच्या कार्यालयात खालील नं वर संपर्ककरू शकता.) जर कालावधीच्या आतील त्यांच्याकडे ID किंवा नियुक्ती लेटर नसेल तर ते सध्या आमचे म्हणजे दै चालु वार्ताचे अधिकृत पत्रकार नाहीत. जरी त्यांच्या पेपरला बातम्या लागत असतील तरीही ते अधीकृत नाहीत (बातम्या पत्रकारच्या नावानी त्यांनी केलेल्या विनंती मुळे लावल्या जातात.)

**टीप :** दै चालु वार्ताच नियुक्ती लेटर किंवा ID ओरिजिनल आहे कसं कळणार. ओरिजिनल ID व नियुक्तीलेटर वर युन्कि रेफरन्स नं आहे जों Ref पासून सुरु होतो.

कार्यालय : जय चेम्बर, दुसरा मजला ऑफिस नं २०७, २०८ शिवाजी रोड स्वारगेट चौक पुणे, मो ९३७३५०४७४८

# भाजप-शिंदेसेनेत ठिणग्या पडायला सुरुवात होणार ?

दै.चालु वार्ता वृत्तसेवा



**मुंबई :** मुंबई महापालिकेत २२७ जागा आहेत. मुंबई भाजप अध्यक्ष ॲड. आशिष शेलार यांनी मुंबईत आपण १८६ जागा जिंकू असा दावा लोकमतला दिलेल्या मुलाखतीत केला होता. काही दिवसांपूर्वी शिंदेसेनेने मुंबईच्या १०० जागांवर दावा केल्याची बातमी आली.

विधानसभेचा भाजपचा स्ट्राइक रेट महापालिकेतही तसाच काम करेल असे गृहीत धरले तर शेलारांच्या मनातले संख्याबळ मिळविण्यासाठी मुंबई महापालिकेत भाजपला किमान २०० ते २२५ जागा लढवाव्या लागतील. मुळात जागा २२७ आहेत. त्यात शिंदेसेनेने १०० जागा मागितल्या आहेत. भाजपने किमान १५० जागा जिंकायच्या ठरवल्या तर शिंदेसेनेला तरी माघार घ्यावी लागेल किंवा भाजपला स्वतःचे स्वबळ विसरावे लागेल. त्याशिवाय यातून मार्ग निघू शकणार नाही. मुंबईत उद्धवसेना आणि राज ठाकरे यांची मनसे काहीच परिणाम करणार नाही, असे गृहीत धरून या दोघांची नुरा कुस्ती सुरूझाली आहे.

गेल्या काही दिवसांत महायुतीतून जी वेगवेगळी विधाने येत आहेत ती ऐकली तरीही हे एकत्र लढतील का? असा प्रश्न निर्माण होतो. रायगडमध्ये खा. सुनील तटकरे यांनी शिंदेसेनेच्या भरत गोगावले यांची नक्कल करून खिल्ली उडवली. अजित पवार गटाचे प्रफुल्ल पटेल यांनी विदर्भात स्वबळावर महापालिका, जिल्हा परिषदेच्या निवडणुका लढवण्याचा दावा केला. त्याला उत्तर म्हणून भाजपचे चंद्रशेखर बावनकुळे यांनी महायुती एकत्र लढेल असे सांगितले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काही अपवाद वगळता, महायुती एकत्र लढेल असे विधान केले आहे. दुसरीकडे शिंदेसेनेचे संजय शिरसाट उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यावर टीका करत आहेत. शिंदेसेनेच्या नीलम गोन्हे यांनी पुण्याच्या हुंडाबळी प्रकरणावरून अजित पवारांवर शालजोडीतून टीकेचे बाण सोडले. महायुतीतील हे एकमेकांशी संवाद साधणारे 'प्रेमाचे सूर' ऐकले तर संगीताच्या अंतिम मैफिलीत भैरवीचा बैंड वाजेल असे काँग्रेसला वाटते.

शेजाऱ्याच्या घरात बँड वाजला म्हणून काँग्रेसच्या घरातून फार तर पेढे वाटले जातील, पण काँग्रेसच्या हाती रिकाम्या पाळण्याचीच दोरी राहील. आम्ही सत्तेशिवाय राहू शकत नाही हे विधान काँग्रेस नेते सर्वत्र खरे करून दाखवण्याच्या प्रयत्नात असतात. आताही तेच होत आहे. महापालिका असो की जिल्हा परिषद, यासाठी काँग्रेसने कंबर कसली आहे... स्वतःला झोकून दिले आहे... अशी स्वप्न देखील काँग्रेस नेत्यांना कधीच पडत नाहीत. 'हम जहाँ खडे होते है, लाईन वही से शुरू होती है...' या डायलॉगवर काँग्रेसचा कदाचित गाढा विश्वास असावा. शरद पवारांची राष्ट्रवादी मुंबई, ठाणे, रायगड, पालघरमध्ये औषधालाही उरलेली नाही. हे असे चित्र असताना उद्धव ठाकरे आणि राज ठाकरे या दोघांनी एकत्र येण्यामुळे महाराष्ट्राच्या नाही तरी निदान मुंबई, ठाणे, नाशिक या बेल्टमध्ये मोठी हलचल होऊ शकते; पण हे दोन बंधू एकत्र आले तर दोन्ही पक्षांतल्या दुसऱ्या फळीच्या नेत्यांना आपले दुकान लंबे होईल याची भीती वाटत असावी. त्यामुळे दोन्ही भाऊ एकत्र येऊ नयेत, अशीच विधाने दोन्ही बाजूचे नेते सतत करत आहेत.

मुख्यमंत्री फडणवीस यांच्यामुळे भाजपकडे इनकमिंग जोरात आहे. शिंदेसेनेकडे गेल्यावर आम्हाला 'एम टॉनिक' मिळते असे जाणारेच जाहीरपणे सांगत आहेत. खरे खोटे त्या दोघांना माहिती. शिंदेसेनेने मुंबईत ज्या माजी नगरसेवकांना उमेदवारी द्यायची आहे त्यांच्या मतदारसंघासाठी विकासनिधी तातडीने देण्याच्या हालचाली सुरूकेल्या आहेत. त्यातून या माजी नगरसेवकांना 'बळ' मिळेल अशी व्यवस्था केली जात आहे. हे जे चालू आहे ते आमच्या नेत्यांना कळत नाही असे तुम्हाला वाटते का ? त्यांच्या 'एम टॉनिक'च्या बाटल्या कुठे थांबवायच्या हे आम्हाला चांगले समजते, असा दावा भाजपचे नेते खासगीत करत आहेत. काही दिवसांपूर्वी एक फोटो व्हायरल झाला होता. तो फोटो पाहिल्यानंतर वर्षानुवर्षे भाजपमध्ये काम करणारे कार्यकर्ते काय विचार करत असतील? ज्यांच्या विरोधात आपण काम केले तेच आता आपल्या नेत्यांच्या मांडीला मांडी लावून बसले आहेत. मग आपण काय करायचे? असा प्रश्न त्यांना पडला तर... असा सवाल मनसे पक्षप्रमुख राज ठाकरे यांनी केला. मात्र हे चित्र बारकाईने बघितले तर ही भविष्यातल्या राजकारणाची नांदी आहे असे म्हणता येईल. या छायाचित्रात शिंदेसेनेचा एकही नेता नाही. याचा अर्थ भविष्यात भाजप आणि अजित पवारांची राष्ट्रवादी अशीच मांडीला मांडी लावून पुढे जाऊ लागली तर..? याचे उत्तर महापालिका व जिल्हा परिषदेच्या निवडणुकीत मिळेल.

# काँग्रेस खासदार रविंद्र चव्हाण संतापले;

## महापालिका आयुक्तांना हक्कभंग कारवाईचा इशारा !

दै.चालु वार्ता वृत्तसेवा



**मुंबई :** केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्या नांदेड दौऱ्याआधीच जिल्ह्यातील राजकीय वातावरण तापले आहे. नांदेडचे काँग्रेस खासदार रविंद्र चव्हाण यांनी महापालिका आयुक्तांना हक्कभंग कारवाईसाठी पत्र देणार असल्याचा इशारा दिला.

अमित शहा यांच्या उपस्थितीत होणाऱ्या कार्यक्रमाचे निमंत्रण न दिल्यामुळे रविंद्र चव्हाण भडकले असून त्यांनी महापालिका आयुक्तांना प्रोटोकॉलची आठवण करून दिली आहे.

महापालिका आयुक्तांनी प्रोटोकॉलचे पालन केले पाहिजे. खासदार म्हणून मी त्यांच्यावर हक्कभंगाची कारवाई सुरु करण्याबाबतचे पत्र देणार असल्याचे चव्हाण यांनी माध्यमांना सांगितले. राज्याचे माजी मुख्यमंत्री दिवंगत वसंतराव नाईक यांच्या पुतळ्याचे अनावरण उद्या (ता.२६) केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांच्या हस्ते होणार आहे. या कार्यक्रमाचे निमंत्रण खासदार रवींद्र चव्हाण यांना देण्यात आले नाही, असा आरोप त्यांनी केला आहे.

नांदेड महापालिकेच्या वतीने आयोजित पुतळा अनावरण कार्यक्रमाच्या निमंत्रणावरूनचा वाद सध्या चांगलाच चर्चेत आला आहे. प्रोटोकॉल म्हणून लोकप्रतिनिधीला आमंत्रण देणे बंधनकारक असते, असे असताना या कार्यक्रमाचे आमंत्रण नांदेडचे खासदार रवींद्र चव्हाण यांनी आलेलं नसल्याचे सांगितले. मला महापालिकेच्या कुठल्याच अधिकाऱ्याचा फोन आलेला नाही. महापालिकेने प्रोटोकॉल पाळायला पाहिजे, असे रवींद्र चव्हाण म्हणाले. खासदार म्हणून मला हक्कभंग संदर्भातील कारवाई करण्याचा अधिकार आहे. उद्या मी पत्र देणार असल्याचे चव्हाण यांनी सांगीतले.


आधीच काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष बी.आर.कदम यांनी आपल्या पदाचा राजीनामा देत उद्या भाजपामध्ये प्रवेश करण्याचा निर्णय घेतला आहे. खासदार अशोक चव्हाण यांनी नुकतीच कदम यांची त्यांच्या घरी जाऊन भेट घेतली होती. तेव्हापासून कदम हे भाजपामध्ये जाणार अशी चर्चा होती. आज त्यांनी काँग्रेस जिल्हाध्यक्षपदाचा राजीनामा दिला. त्यामुळेही खासदार रविंद्र चव्हाण संतप्त झाले आहेत. त्यातच महापालिका आयुक्तांनी त्यांना अमित शहा यांच्या उपस्थितीत होणाऱ्या कार्यक्रमाचे निमंत्रण न दिल्याने त्यांच्या संतापात अधिकच भर पडली.

रविंद्र चव्हाण यांनी यावेळी अशोक चव्हाण यांच्यावरही टीका केली. काँग्रेसने अशोक चव्हाण यांच्या घराण्याला मोठं करण्याचं काम ५० वर्ष केलं. मोठी मोठी पदं त्यांना दिली. तरी अशोक चव्हाण काँग्रेसमधून बाहेर पडले. निष्ठावंत काँग्रेस कार्यकर्त्यांना याचा प्रचंड राग होता. तो जनतेने आणि काँग्रेसच्या कार्यकर्त्यांनी वसंतराव चव्हाण यांना लोकसभेला निवडून देत मतपेटीतून व्यक्त केला.

त्यानंतर पोटनिवडणुकीत त्यांनी मला निवडून दिलं. त्यामुळे काँग्रेसचा प्रत्येक कार्यकर्ता हा आमचा नेता आहे. काँग्रेसचा कार्यकर्ता येणाऱ्या निवडणुकांमध्ये सर्व निवडणुका जिंकून दाखवेल, असा विश्वास आम्हाला आहे. बी.आर.कदम यांनी नांदेड जिल्हा काँग्रेस कमिटीला ते कुठं जाणार हे सांगितलेलं नाही. त्यांनी काँग्रेससाठी ४० वर्ष काम केलं आहे. ते पक्ष बदलणार आहेत हे तुमच्या माध्यमातून ऐकत आहोत. पक्ष सोडण्याचं कारण त्यांनी सांगावं, असे रविंद्र चव्हाण म्हणाले.

# राज्यात करोना संसर्गात मोठी वाढ !

दै.चालु वार्ता वृत्तसेवा



**मुंबई :** राज्यातील करोना रुग्णसंख्येत वाढ सुरूच असून, गेल्या २४ तासांत आणखी ४३ रुग्ण आढळले आहेत. राज्यात सर्वाधिक ३५ रुग्ण मुंबईत असून, पुण्यातही ८ जणांना संसर्ग झालेला आहे. या महिन्यात करोनाचे एकूण २४२ रुग्ण आढळले आहेत. सार्वजनिक आरोग्य विभागाने दिलेल्या माहितीनुसार, राज्यात गेल्या २४ तासांत करोनाचे ४३ रुग्ण आढळून आले. त्यात मुंबई ३५, पुणे महापालिका ७ आणि पुणे ग्रामीण १ अशी रुग्णसंख्या आहे. राज्यात १ जानेवारी ते २५ मे पर्यंत करोनाच्या ७ हजार ३८९ संशयित रुग्णांच्या चाचण्या करण्यात आल्या. त्यात ३०० रुग्णांना करोनाचे निदान झाले. त्यात मुंबईत सर्वाधिक २४८ रुग्णांची नोंद झाली आहे. राज्यातील करोनाची सक्रिय रुग्णसंख्या २०९ असून, ८७ रुग्ण बरे झाले आहेत.

राज्यात जानेवारीपासून आतापर्यंत करोनाच्या ४ रुग्णांचा मृत्यू झाला आहे. हे सर्व रुग्ण सहव्याधीग्रस्त होते. त्यातील एका रुग्णास मूत्रपिंडविकारासह चेताविकार होता, तर दुसऱ्या रुग्णास कर्करोग होता. तिसऱ्या रुग्णास ब्रेन स्ट्रोक आला होता आणि त्याला अपस्माराचा आजार होता. चौथ्या रुग्णास गंभीर स्वरूपाचा मधुमेहाचा आजार होता, असे आरोग्य विभागाने स्पष्ट केले आहे.

**कोणत्या जिल्ह्यात किती रुग्ण जाणून घ्या...**

**राज्यातील करोना संसर्ग (१ जानेवारी ते २५ मे)**

करोना चाचण्या – ७ हजार ३८९

एकूण रुग्ण – ३००

मुंबईतील रुग्ण – २४८

सक्रिय रुग्ण – २०९

बरे झालेले रुग्ण – ८७

रुग्ण मृत्यू – ४

आरोग्य विभागाकडून उपाययोजना राज्यात करोनाचा संसर्ग वाढू लागल्याच्या पार्श्वभूमीवर आरोग्य विभागाने उपाययोजना सुरूकेल्या आहेत. राज्यात रुग्णांचा शोध घेण्यासाठी फ्लू आणि श्वसनविकाराच्या रुग्णांचे सर्वेक्षण सुरू आहे. सर्वेक्षणामध्ये आढळलेल्या संशयित रुग्णांची करोना चाचणी केली जात आहे. राज्यात करोनाचे रुग्ण सध्या तुरळक आढळून येत आहेत. त्यांच्यात सौम्य लक्षणे दिसून येत आहेत. शासकीय रुग्णालयांत करोना तपासणी आणि उपचारांची सुविधा उपलब्ध आहे. त्यामुळे नागरिकांनी घाबरून जाऊ नये,' असे आवाहन आरोग्य विभागाच्या सहसंचालिका डॉ. बबिता कमलापूरकर यांनी केले.

# पक्षासोबत दोनदा बंडखोरी तरीही २ वेळा मुख्यमंत्री

## असा आहे विलासराव देशमुखांचा जीवनप्रवास !

दै.चालु वार्ता वृत्तसेवा



**मुंबई :** महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री विलासराव देशमुख यांची जयंती. २६ मे १९४५ रोजी लातूर जिल्ह्यातील बाभळगाव येथे देशमुख कुटुंबात त्यांचा जन्म झाला.

मराठवाड्यातील ग्रामीण भागातच विलासराव देशमुख यांचे दहावीपर्यंतचे शिक्षण झाले. त्यानंतर महाविद्यालयीन शिक्षणासाठी ते पुण्यात आले. पुण्यातील आबासाहेब गरवारे महाविद्यालयात त्यांनी बी.एस्सी आणि बी. ए चे शिक्षण पूर्ण केले, पुण्यातूनच त्यांनी कायद्याची पदवीही मिळवली. याच काळात त्यांनी दुष्काळग्रस्त लोकांना मदत करून सामाजित कार्यही सुरूकेले.

विलासराव राजकीय शिडी चढत असताना त्यांनी त्यांच्या कुटुंबालाही खूप आधार दिला. विलासरावांच्या पत्नीचे नाव वैशाली देशमुख आहे आणि त्यांना तीन मुले आहेत. अमित देशमुख सध्या लातूर विधानसभा मतदारसंघाचे प्रतिनिधित्व करतात. दुसरा मुलगा रितेश आणि तिसरा मुलगा धीरज. रितेश देशमुख आज बॉलिवूड अभिनेता आहे.

**विलासराव देशमुख यांची राजकीय कारकीर्द**

विलासरावांचे शिक्षण पुणे शहरात झाले, परंतु त्यांची राजकीय कारकीर्द त्यांच्या गावात सुरू झाली. पुण्यात शिक्षण घेतल्यानंतर ते पुन्हा गावी निघून गेले. वकिलीची प्रॅक्टिस करत असतानाच १९७४ मध्ये ते बाभळगाव ग्रामपंचायतीचे सदस्य झाले. ते १९७४ ते १९७९ पर्यत गावाचे सरपंच होते. १९७४ मध्ये राजकारणात प्रवेश केलेल्या विलासरावांनी कधीही मागे वळून पाहिले नाही.

ग्रामपंचायत सदस्य आणि सरपंच म्हणून कारकिर्द सुरूकरणारे विलासराव नंतर उस्मानाबाद जिल्हा परिषदेचे सदस्य आणि लातूर तालुका पंचायत समितीचे अध्यक्ष झाले. १९७५ ते १९७८ पर्यंत त्यांनी उस्मानाबाद युवक काँग्रेसचे अध्यक्ष म्हणूनही काम पाहिले. या काळात त्यांनी युवक कल्याणासाठी पाच कलमी कार्यक्रम राबविला. युवक काँग्रेसमधील त्यांच्या कामगिरीचे फळ मिळाले आणि ते उस्मानाबाद जिल्हा काँग्रेसचे अध्यक्ष झाले.

**जेव्हा देशमुख ठाकरेंना भेटण्यासाठी मातोश्रीवर**

१९९५ च्या विधानसभा निवडणुकीत त्यांचा पराभव झाला, पण त्यांनी हिंमत कायम होती. शिवसेनेच्या मदतीने त्यांनी विधान परिषदेची निवडणूक लढवण्याचा निर्णय घेतला आणि शिवसेनाप्रमुख बाळ ठाकरे यांचा पाठिंबा मिळविण्यासाठी 'मातोश्री'वर पोहोचले. तथापि, शिवसेनेची मदत घेऊनही, ते विधान परिषदेच्या निवडणुकीत पराभूत झाले. काँग्रेसविरुद्ध बंड केल्यानंतर, शिवसेनेची मदत घेतल्यानंतर आणि काँग्रेसच्या अधिकृत उमेदवाराविरुद्ध निवडणूक लढवल्यानंतर, भविष्यात तो त्याच काँग्रेसचा आवडता उमेदवार होईल असे क्वचितच कोणी विचार केला असेल. पण काँग्रेस विलासरावांची एक जननेता म्हणून असलेली प्रतिमा दुर्लक्ष करूशकत नव्हती. काही वर्षांतच ते पुन्हा काँग्रेसचे आमदार झाले आणि नंतर महाराष्ट्राचे मुख्यमंत्रीही झाले.

**१८ ऑक्टोबर १९९९ रोजी ते पहिल्यांदा मुख्यमंत्री**

१९९५ च्या निवडणुकीत पराभूत झालेल्या देशमुख यांनी १९९९ च्या विधानसभा निवडणुकीत विक्रमी मतांनी विजय मिळवला. हा तो काळ होता जेव्हा शरद पवार यांनी काँग्रेसशी संबंध तोडले आणि राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाची स्थापना केली आणि स्वतंत्रपणे निवडणुका लढवल्या. १४ मार्च १९९५ ते ११ ऑक्टोबर १९९९ पर्यंत महाराष्ट्रात शिवसेना-भाजप युतीचे सरकार होते. १९९९ च्या विधानसभा निवडणुकीत तुटपुंजे जनादेश मिळाला. शिवसेना-भाजपला रोखण्यासाठी काँग्रेस आणि राष्ट्रवादीने युती सरकार स्थापन केले आणि त्याची कमान विलासराव देशमुख यांच्याकडे सोपवण्यात आली. विलासरावांनी १८ ऑक्टोबर १९९९ रोजी पहिल्यांदा महाराष्ट्राचे मुख्यमंत्री म्हणून शपथ घेतली आणि १७ जानेवारी २००३ पर्यत राज्याची सूत्रे सांभाळली.

**मुंबईवरील दहशतवादी हल्ल्यानंतर राजीनामा**

यानंतर त्यांचे जवळचे सहकारी सुशील कुमार शिंदे यांनी १८ जानेवारी २००३ ते १९ ऑक्टोबर २००४ पर्यत मुख्यमंत्रीपद भूषवले. पण १ नोव्हेंबर २००४ रोजी देशमुख यांनी मुख्यमंत्री म्हणून आपली दुसरी इनिंग सुरू केली. २६ नोव्हेंबर २००८ रोजी मुंबईवर झालेल्या दहशतवादी हल्ल्यामुळे त्यांनी ४ डिसेंबर २००८ रोजी मुख्यमंत्रीपदाचा राजीनामा दिला. मुख्यमंत्रीपदाचा राजीनामा दिल्यानंतर ते केंद्रीय राजकारणात सक्रिय झाले. ८ मे २००९ रोजी ते मनमोहन सिंग मंत्रिमंडळात केंद्रीय उद्योग मंत्री झाले. जानेवारी २०११ मध्ये त्यांचे खाते बदलण्यात आले आणि त्यांना ग्रामीण विकास खाते देण्यात आले.

# देवेंद्र फडणवीसांना ही शेवटची संधी अन्यथा...

## मनोज जरांगे पाटलांचा इशारा; 'चलो मुंबई'चा नारा...

दै.चालु वार्ता वृत्तसेवा



**मुंबई :** मराठा आरक्षणासाठी मनोज जरांगे पाटील हे पुन्हा एकदा आक्रमक झाले आहेत. २९ ऑगस्टला ते मुंबईत आंदोलन करणार आहेत. या आंदोलनात गोदाकाठची १२३ गावं सहभागी होणार आहेत. त्या गावांच्या ग्रामस्थांची बैठक अंबड तालुक्यातील महाकाळा येथे रविवारी झाली. या बैठकीत मनोज जरांगे पाटील यांनी मार्गदर्शन करत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांना इशारा दिला.

जरांगे पाटील म्हणाले, 'मराठा आरक्षण देण्यासाठी ही शेवटची संधी देतोय. एक दिवस मिळून असे मागे लागतील देवेंद्र फडणीसला घर राहणार नाही. सुधरभाऊ आम्ही तुला सुधरायला संधी देतोय. मराठ्यांना आरक्षण द्या नाहीतर भयानगर परिणाम घडवून आणू.'

मनोज जरांगे म्हणाले, मुंबईला जाण्याची तयारी आत्तापासून करा. आरक्षण आपल्या हक्काचे आहे ते सोडू नका. आरक्षण हे अमृत आहे. गाफील राहू नका, आम्ही कोणाच्या बापाचे आरक्षण मागत नाही. आरक्षण देण्याची सरकारला ही शेवटची संधी आहे. अन्यथा मराठा समाजाच्या रोषाला सरकारला सामोरे जावे लागेल.

**भुजबळ–फडणवीसांना फिरू देणार नाही**

मराठा विरुद्ध ओबीसी वाद लावण्याचे काम मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे छगन भुजबळांच्या आडून करत आहे. ज्या कुणबी नोंदी सापडल्या आहेत त्याची व्हॅलिडिटी देण्यास टाळाटाळ करण्यात येत आहे. अधिकाऱ्यांना सांगून त्यामध्ये त्रुटी काढल्या जात आहेत. जर मराठा आरक्षणाला विरोध कराल तर देवेंद्र फडणवीस आणि छगन भुजबळ यांना रस्त्यावर फिरूदेणार नसल्याचा इशारा मनोज जरांगे पाटील यांनी दिला.

**समाजाशी गद्दारी करणार नाही**

आमचा लढा हा गोरगरीब मराठ्यांसाठी आहे. मराठ्यांना आरक्षण मिळवून दिल्याशिवाय मी शांत बसणार नाही. माझ्या विरोधात बदनामीचा कट रचला जातोय तरी मी शांत बसणार नाही. मी एकही वाईट काम केले नाही त्यामुळे मी घाबरणार नाही. जीव गेला तरी चालेल पण समाजाशी गद्दारी करणार नाही, असे मनोज जरांगे पाटील म्हणाले.

# भाजपच्या वाटेवरील अशोक डक यांना रोखण्यासाठी राष्ट्रवादीचे प्रयत्न...

दै.चालु वार्ता वृत्तसेवा




**मुंबई :** उपमुख्यमंत्री तथा बीडचे पालकमंत्री अजित पवार यांचे कट्टर समर्थक म्हणून ओळख असलेले माजलगाव येथील नेते अशोक डक यांना भाजपच्या प्रवेशापासून रोखण्यासाठी राष्ट्रवादी काँग्रेसकडून (अजित पवार) प्रयत्न सुरूझाले आहेत.

उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या स्वीय सहायक कार्यालयातूनही डक यांना रविवारी सकाळीच फोन आल्याची माहिती आहे. डक यांनीही त्याला दुजोरा दिला. पक्षाच्या मराठवाड्यातील अनेक नेत्यांकडूनही डक यांना फोन गेल्याचे समजते. मात्र, डक हे भाजप प्रवेशावर ठाम असल्याची माहिती त्यांच्या निकटवर्तीयांकडून मिळाली असून, येत्या दोन-तीन दिवसांतही ते मुंबईत काही नेत्यांच्या भेटी-गाठी करणार असल्याचे सांगण्यात आले. विशेषत: त्यांच्या पक्षांतर्गत राजकीय विरोधकांकडूनही भाजपमधील प्रवेशाला आडकाठी आणण्यासाठी हालचाली गतिमान झाल्याचेही सांगण्यात येत आहे. डक यांचा संभाव्य भाजपतील प्रवेश हा मराठवाड्यात आणि त्यातही बीडमध्ये राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाची संघटना बळकट करण्याचे 'लक्ष्य' ठेवणारे उपमुख्यमंत्री अजित पवार यांना धक्का ठरणारा आहे. अजित पवार यांचे कट्टर समर्थक म्हणून ओळख असलेले आणि त्यांच्याच पाठबळाने मुंबई बाजार समितीचे सभापतिपद अशोक डक यांना मिळाले होते. सध्या ते मुंबई बाजार समितीचे व पुणे येथील राज्य बाजार समिती महासंघाचेही संचालक आहेत. भाजपलाही डक यांच्या रुपाने माजलगावमध्ये एक चेहरा हवा आहे. डक यांचे माजलगावचे आमदार प्रकाश सोळंके यांच्याशी राजकीय मतभेद असून, डक-सोळंके घराण्यात यापूर्वीच्या पिढीपासून वाद आहे. भाजपही माजलगावात नव्या चेहऱ्याच्या शोधात आहे.

# धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज जयंती निमित्त 'श्री मृत्युंजय रक्तसंकलन महामेळावा' संपन्न

दै.चालु वार्ता वृत्तसेवा




**पुणे :** भक्तिमय विचारधारणेतून संघटित युवा शक्ती 'श्री देवदर्शन यात्रा समिती, पुणे' च्या वतीने हिंदवी स्वराज्यरक्षक 'धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज' यांच्या जयंती दिनाचे औचित्य साधून 'श्री मृत्युंजय रक्तसंकलन महामेळावा' चे आयोजन करण्यात आले. धर्मवीर छत्रपती संभाजी महाराजांनी हिंदवी स्वराज्याचे रक्षण करण्याकरीता आपले बहुमूल्य रक्त कर्मी आणले. शंभूराजेंच्या याच ज्वलंत प्रेरणेने समाजातील गरजवंत रुग्णांप्रती असलेल्या काळजीपोटी समिती सदस्यांनी एकत्र येत पुण्यातील नामांकित जहांगीर हॉस्पिटल मधील रक्तपेढीत नि:संकोचपणे रक्तदान करून या संकल्पनेची पूर्तता केली गेली.

वैद्यकीय क्षेत्रात रक्ताचा तुटवडा जाणवू लागल्याने मध्यंतरी अनेक वृत्तसमूहांनी सर्व नागरिक आणि सामाजिक संस्थांना रक्तदान करण्याचे आवाहन केले होते. याच आवाहनाला प्रतिसाद देत आपल्या बहुमूल्य रक्ताची एक बॅग स्वराज्यासाठी स्वयंस्फूर्तीने अर्पण करून समिती सदस्य सामाजिक सहकार्याचा निर्मळ संदेश सर्वदूर पोचविण्यास सेवार्थ झाले. याचे रक्तपेढीतील सर्व वैद्यकीय कर्मचारी वृंदाने मनापासून कौतुक केले.

रक्तदान केलेल्या प्रत्येक सदस्यास रक्तपेढी आणि समितीच्या वतीने गौरविण्यात आले. तसेच अतिशय काळजीपूर्वक रक्त संकलित करून घेतल्याने जहांगीर हॉस्पिटल रक्तपेढीतील कर्मचारी वृंदाचा समितीच्या वतीने विशेष सन्मान करण्यात आला.

अशाच प्रकारचे उपक्रम भविष्यात राबवून समाजाची निस्वार्थ सेवा करण्याचा प्रयत्न करणार असल्याचे नमूद करत समितीचे प्रमुख सदस्य सागर सुभाष नाईकरे यांनी एकमेकांप्रती आभार प्रदर्शित केले.

# नांदेडमधील पर्जन्यमापक यंत्रणाच बंद !

## पावसाची नोंद करणार कुठे; नुकसान भरपाई मिळणार का ?

दै.चालु वार्ता वृत्तसेवा



**नांदेड :** मान्सूनपूर्व पाऊस जिल्ह्यात आठ दिवसांपासून ठाण मांडून आहे. मेघगर्जना व वादळी वाऱ्यासह बरसणाऱ्या पावसाने केवळ जनजीवन विस्कळीत झाले नसून पाऊस मोजणारी पर्जन्यमापक यंत्रणासुद्धा बंद पडली आहे. त्यामुळे कोणत्या मंडळात किती पाऊस झाला याची नोंद सध्यातरी शासनदरबारी होत नाही. परिणामी एखाद्या मंडळात अतिवृष्टी झाल्यास त्याचे मोजमाप कसे करणार व नुकसान भरपाई मिळणार का? असा प्रश्न उपस्थित होत आहे. हवामान विभागाने नांदेड जिल्ह्यात आणखी चार दिवस पाऊस पडणार असल्याचा अंदाज वर्तविला आहे. रविवारी ऑरेंज तर त्यानंतर तीन दिवस यलो अलर्ट दिला आहे. मे महिन्याच्या प्रारंभी अवकाळीने दाणादाण उडवली. उर्वरित पीके व खरीप पेरणीच्या पूर्वतयारीवर मान्सूनपूर्व पावसाने पाणी फिरवले आहे. वादळी वारे व वीज पडून जीवित हानीसह लाखमोलाचे पशुधनही गमवावे लागते. त्यात शेतातील पिके, फळबागा व भाजीपाला जमीनदोस्त झाला आहे. दोन्ही बाजूने नुकसान झाल्याने शेतकरी, मजूरवर्ग मेटाकुटीला आला आहे. रणरणत्या उन्हात राबून मशागत करून तयार केलेली जमीन मान्सूनपूर्व पावसाने चिखलात रुतली आहे. आता सुरू असलेल्या पावसावर पेरणी उरकली व ऐन पावसाळ्यात उघड दिली तर बियाणे करपण्याची भीती आहे. त्यामुळे सर्वच बाजूने शेतकरी अडचणीत येण्याची चिन्हे दिसून येत आहेत.

**२४ तासात ११ मि.मी. पाऊस ?**

जिल्हा यंत्रणेकडून गत २४ तासात ११ मि.मी. पाऊस झाल्याचे सांगण्यात आले. त्यात नांदेड- ९.५, बिलोली- १२.२, मुखेड- १०, कंधार-९.२, लोहा-५.५, हदगाव-११.८, भोकर- ११.४, देगलूर-१३, किनवट-२.९, मुदखेड-३.९, हिमायतनगर-१.५, माहूर-००, धर्माबाद-३.२, उमरी-०.९, अर्धापूर-५.० व नायगाव तालुक्यात २.१ मि.मी. पाऊस झाल्याची नोंद घेण्यात आली. विशेष म्हणजे, गत चार दिवसात सर्व तालुक्यात दररोज इतकाच पाऊस झाल्याची आकडेवारी पर्जन्यमापक विभागाकडून प्रसिद्ध करण्यात आली आहे. वातावरणाच्या नोंदी घेणारी स्कायमेट यंत्रणा सर्व्हरमध्ये तांत्रिक बिघाड झालेली असताना ही आकडेवारी आली कुठून असा प्रश्न उपस्थित होत आहे.

# निमसाखर गावात मोफत 'बेसिक टू अ‍ॅडव्हान्स आरी वर्क' प्रशिक्षणाचा उद्घाटन समारंभ उत्साहात पार पडला

दै.चालु वार्ता वृत्तसेवा

इंदापूर - प्रतिनिधी

बापू बोराटे





**पुणे (इंदापूर) :** ग्रामपंचायत निमसाखर चे विद्यमान सरपंच धैर्यशील विजयसिंह रणवरे यांच्या हस्ते 'बेसिक टू अ‍ॅडव्हान्स आरी वर्क' मोफत प्रशिक्षणाचा उद्घाटन समारंभ उत्साहात पार पडला. हे प्रशिक्षणाचे काम द ब्रिलियंट हेल्थ अ‍ॅण्ड अ‍ॅग्री संस्था अंतर्गत सखी महिला कौशल्य विकास प्रशिक्षण केंद्र या संस्थेला दिले आहे. संस्थेकडून हे प्रशिक्षणाचे काम उत्तम रित्या राबवले जात आहे. आज या प्रशिक्षणाचा चौथा दिवस होता.

यावेळी सरपंच रणवरे यांनी प्रशिक्षण वर्गास भेट देऊन महिलांनी केलेले आरी वर्क पाहिले व त्यांचे कौतुक केले. प्रशिक्षणादरम्यान येणाऱ्या अडचणी जाणून घेत प्रशिक्षणार्थी महिलांशी संवाद साधला. सरपंच रणवरे यांच्या पुढाकाराने गावातच असे प्रशिक्षण उपलब्ध झाल्याने महिला खूप आनंदित असून, मनापासून हे कौशल्य आत्मसात करत आहेत.

याआधी बेसिक शिलाई मशीन प्रशिक्षण व ब्युटी पार्लर प्रशिक्षण गावात मोफत दिले गेले होते. त्यानंतर महिलांनी अ‍ॅडव्हान्स प्रशिक्षणाची मागणी केली असता सरपंच रणवरे यांनी तत्काळ स्वखर्चातून ६० हजार रुपये खर्च करून अ‍ॅडव्हान्स ब्युटी पार्लर व शिलाई प्रशिक्षण सुरू केले. या उपक्रमातून महिलांच्या स्वावलंबनासाठीची त्यांची तळमळ अधोरेखित होते.

येत्या काळात गावात फॅशन डिझाईन प्रशिक्षण सुरू होणार असून, महिलांनी या संधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन करण्यात आले. यासोबतच जून महिन्याच्या पहिल्या आठवड्यात 'दूध प्रक्रिया व दुग्धजन्य पदार्थ निर्मिती' कार्यशाळा मोफत आयोजित केली जाणार आहे, असे सरपंच रणवरे यांनी जाहीर केले.

शेतकरी बांधवांसाठी एक महत्त्वाची घोषणा करताना त्यांनी सांगितले की, निमसाखर हे नीरा नदीच्या काठावर वसलेले असल्याने येथील पाण्यात क्षारांचे प्रमाण अधिक आहे. त्यामुळे जमिनीचा पोत खराब झाला आहे. यासाठी मोफत माती परीक्षण मोहिम राबवण्यात येणार असून, शेतकऱ्यांनी माती नमुने घेऊन यावे, असे आवाहन त्यांनी केले.

महिला सक्षमीकरण, शाश्वत शेती आणि कौशल्य विकासाच्या दिशेने सरपंच रणवरे यांचे हे पाऊल कौतुकास्पद असून, ग्रामविकासाचा आदर्श निर्माण करणारे ठरत आहे.

# जिल्हा बँक नोकरभरती प्रकरण:

## एसआयटीव्दारे चौकशीचे मुख्यमंत्र्यांचे आदेश !

दै.चालु वार्ता वृत्तसेवा



**मुंबई :** जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या निवडणूक अधिसूचनेकडे सहकार क्षेत्राचे लक्ष लागले असतानाच बँकेतील ३५८ पदांच्या नोकरभरतीची विशेष तपास पथकामार्फत (एसआयटी) चौकशी करण्याचे आदेश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले. यासंदर्भातील मुख्यमंत्र्यांची स्वाक्षरी असलेले पत्र निघाल्याने बँकेच्या विद्यमान संचालक मंडळात खळबळ उडाली आहे. 'एसआयटी' चौकशीसाठी आमदार सुधीर मुनगंटीवार आग्रही होते, तर मुख्यमंत्र्यांच्या काकू माजी मंत्री शोभा फडणवीस यांनी मात्र ही चौकशी लागू नये यासाठी बरेच प्रयत्न केल्याची चर्चा राजकीय वर्तुळात आहे.

जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेतील ३५८ पदांच्या नोकरभरतीत मोठ्या प्रमाणात आर्थिक देवाण-घेवाण झाल्याचा मुद्दा माजी मंत्री मुनगंटीवार यांनी विधानसभेत लावून धरला होता. त्यांनी आरक्षण बचाव संघर्ष कृती समितीसोबत मुख्यमंत्र्यांची भेटही घेतली होती. नोकरभरतीप्रकरणी भाजप ओबीसी सेलचे मनोज पोतराजे यांनी १५ दिवस आमरण उपोषण केले होते. मुनगंटीवार यांच्या मागणीची दखल घेत मुख्यमंत्र्यांनी यासंदर्भातील आदेशावर स्वाक्षरी करीत नोकरभरतीच्या 'एसआयटी' चौकशीला हिरवा कंदील दिला. यामुळे बँकेच्या विद्यमान संचालक मंडळात खळबळ उडाली आहे.

**'जिल्हा बँकेतील सायबर घोटाळ्याची न्यायवैद्यक तपासणी करा'**

जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेत तब्बल २.९३ कोटी रुपयांचा सायबर घोटाळा झाला असून या प्रकरणाची तातडीने न्यायवैद्यक तपासणी (फॉरेंसिक टेस्ट) करून गुन्हा दाखल करण्याची मागणी आमदार किशोर जोरगेवार यांनी पोलीस महासंचालकांकडे केली आहे. विशेष म्हणजे, बँकेने सायबर सुरक्षेवर १०० कोटींचा खर्च केल्याचा दावा आमदार जोरगेवार यांनी केला आहे. दरम्यान, जोरगेवार यांनी फेब्रुवारी महिन्यात झालेल्या सायबर हल्ल्याच्या चौकशीची मागणी मे महिन्यात केल्याने, यामागे राजकीय स्वार्थ तर नाही ना, अशी चर्चा राजकीय वर्तुळात सुरूआहे. बँकेचे अध्यक्ष, मुख्य कार्यकारी अधिकारी, आयटी विभागप्रमुख, संगणक सहाय्यक तसेच सायबर सिक्युरिटी पुरवठादार यांच्या संगनमतातून हा घोटाळा झाल्याचा संशय जोरगेवार यांनी वर्तवला आहे.

मुख्यमंत्र्यांनी 'एसआयटी' चौकशी लावली आहे. यासंदर्भातील पत्रावर त्यांनी नुकतीच स्वाक्षरी केली. हे पत्र आपणास मिळाले आहे. 'एसआयटीत' कोणत्या अधिकाऱ्यांचा समावेश राहील, हे अद्याप ठरलेले नाही. मी लवकरच पोलीस महासंचालक रश्मी शुक्ला यांची भेट घेणार आहे.- सुधीर मुनगंटीवार, माजी मंत्री.

बँकेच्या अंतर्गत समितीचा 'फॉरेन्सिक' अहवाल अपुरा व दिशाभूल करणारा आहे. यामुळे पुनर्तपासणी करणे गरजेचे आहे. या प्रकरणाच्या चौकशीसाठी विशेष तपास पथक नेमण्यात यावे. संबंधित अध्यक्ष व अधिकाऱ्यांवर गुन्हा दाखल करण्यात यावा, 'फॉरेन्सिक ऑडिट'चा अहवाल स्वतंत्र तज्ज्ञांकडून तपासण्यात यावा व पोलीस तपासाला गती देऊन दोषींवर तातडीने कारवाई करण्यात यावी.- किशोर जोरगेवार, आमदार, भाजप.

# दोन्ही राष्ट्रवादी पुन्हा एकत्र येणार...

## चर्चा अंतिम टप्प्यात; वाचा काय म्हणाल्या सुनेत्रा पवार...

दै.चालु वार्ता वृत्तसेवा



**मुंबई :** गेल्या अनेक दिवसांपासून दोन्ही राष्ट्रवादी एकत्र येण्याच्या चर्चा सुरू आहेत. (NCP) त्याचवेळी दोन्ही ठाकरे बंधू एकत्र येणार असल्याचीही चर्चा सुरू आहे, तर दुसरीकडे दोन्ही पवारदेखील एकत्र येणार असल्याची चर्चा होत आहे. यावर आता राष्ट्रवादीच्या खासदार सुनेत्रा पवार यांनी प्रतिक्रिया दिली आहे, त्या पंढरपूरमध्ये महिला मेळाव्यात बोलत होत्या.

राजकारण आणि कुटुंब या दोन वेगवेगळ्या गोष्टी आहेत, दोन्ही पक्ष एकत्र येणार ही फक्त चर्चा आहे. जे काही होईल ते आपण बघालच असे म्हणत दोन्ही राष्ट्रवादीच्या एकत्रीकरणारवर प्रतिक्रिया देताना सुनेत्रा पवार यांनी हात जोडत, या विषयावर अधिक बोलणं टाळलं आहे.

दरम्यान, पुण्यातील विवाहिता वैष्णवी हगवणे हीने गळफास घेऊन आत्महत्या केली आहे. सासरच्या छळाला कंटाळून तिने आत्महत्या केल्याचा आरोप होत आहे, या घटनेनं संपूर्ण राज्यात खळबळ उडाली आहे, यावर देखील सुनेत्रा पवार यांनी प्रतिक्रिया दिली आहे. वैष्णवी हगवणे बाबत झालेल्या घटनांचे समर्थन करत नाही, अशा घटना व्हायला नको आहेत. पक्षाने याबाबत भूमिका मांडलेली आहे. महिला आयोगाकडून दिरंगाई होते याबाबत सुद्धा पक्षाच्या पदाधिकाऱ्याने भूमिका मांडलेली आहे, अशी प्रतिक्रिया या प्रकरणावर सुनेत्रा पवार यांनी दिली आहे.

ज्या कुटुंबाचं वार्षिक उत्पन्न हे अडीच लाखांच्या आत आहे, अशा कुटुंबातील महिलांसाठी सरकारने मुख्यमंत्री लाडकी बहीण योजना सुरूकेली आहे, या योजनेंतर्गत महिलांच्या बँक खात्यामध्ये दर महिन्याला दीड हजार रुपये जमा केले जातात. मात्र अजूनही वाढीव रकमेबाबत कोणताही निर्णय घेण्यात आला नाही, यावर बोलताना सुनेत्रा पवार यांनी म्हटलं की, लाडक्या बहिणींच्या वाढीव हप्त्याबाबत अजितदादा निर्णय घेतील, ते जे बोलतात ते करतात, आपल्याला माहीत आहे.






# पश्चिम महाराष्ट्रातील आणखी एक प्रभावशाली घराणे भाजपच्या वाटेवर...

## शरद पवारांचे निकटवर्तीय पाटणकर कुटुंबीय राष्ट्रवादी सोडणार !

दै.चालु वार्ता वृत्तसेवा



**मुंबई :** राष्ट्रवादी कॉंग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे पाटण (जि. सातारा) येथील नेते सत्यजितसिंह पाटणकर हे येत्या काही दिवसांत भारतीय जनता पक्षात प्रवेश करणार असल्याची माहिती आहे. भविष्यातील राजकीय वाटचालीसंदर्भात पाटणकर गटाने पाटण येथे बैठक बोलावली असून, यात ते भाजप प्रवेशासंदर्भात आपल्या समर्थकांशी चर्चा करून निर्णय घेणार आहेत. सत्यजित हे शरद पवारांचे निकटवर्तीय व माजी सार्वजनिक बांधकाम मंत्री विक्रमसिंह पाटणकर यांचे चिरंजीव आहेत. यानिमित्ताने गेल्या अनेक वर्षांपासून राष्ट्रवादीत कार्यरत असलेले आणखी एक तालेवर घराणे भाजपच्या वाटेवर असल्याचे स्पष्ट झाले आहे. सातारा जिल्ह्यातील पाटण तालुक्यात बाळासाहेब देसाई (१९५२ ते १९८३ आमदार) आणि विक्रमसिंह पाटणकर (१९८३ ते २०१४ आमदार) या दोन मातब्बर राजकीय घराण्याचे वर्चस्व राहिले आहे. २०१४ पासून पुन्हा एकदा पाटण मतदारसंघात देसाई घराण्यातील शंभूराज देसाई यांनी वर्चस्व मिळवले आहे. सध्या कॅबिनेटमंत्री असलेल्या शंभूराज देसाईंनी सत्यजित पाटणकर यांचा गेल्या वर्षी झालेल्या विधानसभा २०२४ च्या निवडणुकीमध्ये सलग तिसऱ्यांदा पराभव केला. शंभूराज यांचा मागील १०-१२ वर्षांतील चढता राजकीय आलेख आणि आता राष्ट्रवादीत फूट झाल्याने पाटणकर यांचे राजकीय भविष्य अंधकारमय झाले आहे. त्यामुळेच पाटणकर कुटुंबीयांनी राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाला रामराम करून भाजपमध्ये प्रवेश करण्याचा निर्णय घेतल्याचे समजते. पाटणकर गटाची सध्या तालुक्यातील पंचायत समितीमध्ये सत्ता आहे. आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांची निवडणूक येत्या चार-पाच महिन्यांत होणार आहे. साताऱ्यातील पाटणमध्ये शंभूराज देसाई हे महायुतीच्या माध्यमातून वर्चस्व मिळवू शकतात, ही भीती असल्याने पाटणकर कुटुंबीयांनी या निवडणुकीच्या पूर्वीच भाजपमध्ये जाण्याबाबत हालचाली सुरूकेल्या आहेत.